विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१८** |
| **वर्ष** | **:** | **बावनवे** |
| **अंक** | **:** | **चौथा** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१८**

**गणपत्रिका क्रमांक : १९४**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : बावन्नावे अंक : चौथा पौष/ माघ शके १९३९ जानेवारी २०१८

## *संपादकीय*

### वदनी कवळ घेता....अन्न हे पूर्णब्रह्म

सद्धर्मच्या सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा !

गेली हजारोवर्षे सगळ्या सभ्यतांमधून (civilization) कालगणनेचा प्रयत्न केलेला दिसतो. भारतीय संस्कृतीने या विषयामध्ये प्रचंड प्रगती केलेली होती. अतिसूक्ष्मापासून अनंतापर्यंत मोजमाप करण्याचा भारतीयांचा हा प्रयत्न मती गुंग करणारा आहे. कालमापनाची ही रचना प्रामुख्याने श्रेणीयुक्त (Linear) आहे. साहजिकच येणारा प्रत्येक दिवस आणि वर्ष हे मागील घटनांच्या अनुभवावर उभे राहते.

अनुभवातून आपण शहाणे होतो असे म्हणतात. अनुभवासारखा दुसरा शिक्षक नाही.

वास्तवामधे मात्र चित्र याच्या उलटे दिसते. दैनंदिन जीवनामध्ये रस्त्यावरील अपघातापासून उपाहारगृहांमधील आगीमध्ये शेकडोजणांचा मृत्यु, दरवर्षी होतांना दिसतो. या सगळ्या घटनांमधे खऱ्या अपघातांचे प्रमाण फारच कमी आहे. बहुतांशवेळा या घटना ह्या आपल्याच बेजबाबदारपणा आणि बेफिकीरीमुळे होत असतात. या गोष्टी टाळण्याकरिता बरेच कायदे केले गेले आहेत. अनेक व्यवस्था आणि यंत्रणांचं अवडंबर उभे केलं आहे. तरीही अशा घटनांचे प्रमाण हे भयावहरीतिने वाढतच आहे. अनुभवातून आपण का शिकत नाही?

''अन्न हे पूर्णब्रह्म'' हे वचन आपल्या सर्वांना माहिती आहे. सामान्य गृहस्थाची जीवनातील सर्व धडपड हीच मुळी चार घास सुखाने मिळवण्याकरता असते. अन्न शिजवणे, अनेक पाककृती करणे याची एक वेगळी संस्कृती आपल्यामधे आहे. दारावर आलेल्या भिक्षुकाला पैशापेक्षा अन्नाची भिक्षा आपण देतो. गाईला चारा देतो एवढेच नाही तर सापालाही आपण दूध पाजतो. आपल्या संस्कृतीमधे 'अन्नदाना'सारखे

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**५) दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **00911010001 6689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ.(आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ५- कुरूक्षेत्र | ६ |
| मनुष्य स्वभाव, वागणूक, आणि रोजचे जीवन, संघर्ष्य | ११ |
| भगवान श्री दत्तात्रेय | १३ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्राचे ब्रीदवाक्य यथापराधं दण्ड : जेवढा अपराध तेवढी शिक्षा | १६ |
| मानस-सरोवर | १९ |
| अंतरात्म्याला भेटण्यासाठी करावी लागणारी 'अंतर्यात्रा' आणि त्यातील महत्त्वाचे टप्पे (मुक्काम) | २२ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.) आणि ऐच्छिक / विशेष देणगी**

श्री. मांद्रेकर उदय डी., माहिम, मुंबई - २०००/-

श्री. केळकर मधुकर वामन, ठाणे - १०००/-

ज्या देणगीदारांनी बँकेत परस्पर देणगी भरली आहे त्यांची यादी पुढील अंकात देण्यात येईल. **- संपादक**

आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती - बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते.

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३३ वा

**न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्तेऽपि[३८१] नातिविश्वसेत्।**

विश्वासास पात्र नसलेल्या व्यक्तीवर विश्वास टाकू नये. एवढेच काय पात्र असलेल्या व्यक्तीवर देखील अतिविश्वास टाकू नये.

दुसरी ओळ :

**विश्वासाद भयमुत्पन्नं**
**मूलान्यपि निकृन्तति।।**

कारण विश्वास ठेवल्यामुळे उत्पन्न झालेले भय आपल्याला मूळापासून उखडून टाकते.

पञ्चतन्त्र-मित्रसम्प्राप्रिः श्लो. ४४ वा. व लब्धप्रणाश श्लोक. १४ वा.

**मूर्खस्य किं शास्त्रप्रसङ्ग?[३८२]**

१) गाढवाला काय गुळाची चव?

२) गाढवापुढे वाचली गीता रातचा गोंधळ बरा होता.

३) ऊर्दू म्हण : गधा क्या जाने जाफरान की कदर? (जाफरान म्हणजे केशर)

संपूर्ण सुभाषित -

**मुक्ताफलैः किं मृगपक्षिणांच?**
**मिष्टान्नपानं कि मुगर्दभानाम्?**
**अन्धस्य दीपो, बधिरस्य गीतं**
**मूर्खस्य किं शास्त्रप्रसङ्ग**

पशुपक्ष्यांना मोत्यांची काय किंमत? मिष्टान्नपानं खरसूकराणां (असाही पाठ आहे. गाढवांना आणि डुकरांना मिष्टान्नाची चव काय? ह्या सर्व गोष्टी म्हणजे आंधळ्यासाठी दिवा आणि बहिऱ्यासमोर सुश्राव्य गायन.)

**साधवो न हि सर्वत्र।[३८३]**

सर्वत्र सज्जन असतात असे नाही.

संपूर्ण सुभाषित -

**शैले शैले न माणिक्यं**
**मौक्तिकं न गजे गजे।**
**साधवो न हि सर्वत्र**
**चन्दनं न वने वने।।**

मौक्तिकं न गजे गजे ही कवी कल्पना आहे.

**तस्य तदेव हि मधुरं ३८४**
**यस्य मनो यत्र लग्नम।।**

ज्याचे मन जिथे जडले असेल तेच त्याला मधुर वाटते.

पहिली ओळ -

**दधि मधुरं, मधु मधुरं**
**द्राक्षा मधुरा, सुधापि मधुरैव।**

पिण्डे पिण्डे मति र्भिन्ना असा आशय यातून प्रकट होतो.

(पृष्ठ १० वर)

## ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् ।

दि. दा. औटी

लेख ११ वा

**हिमालये तु केदारम्।**
**महिदिपार्श्वे च तटे रमन्तं**
**सम्पूज्यमानं सततं मुनीन्द्रैः।**
**सुरासुरैर्यक्षमहोरगाद्यैः**
**केदारमीशं शिवमेकमीडे।।**

अन्वय : महा-अद्रि-पार्श्चे तटे च रमन्तं, सततं मुनीन्द्रैः सुर-असुरैः यक्ष-महा-उरगाद्यैः सम्पूज्यमानं ईशं केदारम् एक शिवम् (अहं) इडे।

भाषांतर - जो ईश्वर महापर्वत हिमालय याच्या जवळील केदारशृङ्गावर तटावर राहतो, ज्याची सतत मुनीश्रेष्ठ, देव, दानव, यक्ष महासर्प पूजा करतात अशा त्या ईश्वराची केदाराची शिवाची मी स्तुती करतो.

श्री केदारनाथ हिमालयाच्या 'केदार' नावाच्या शिखरावर विराजमान आहेत. शिखराच्या पूर्वेकडे अलकनन्दाच्या तटावर बद्रीनाथ अवस्थित आहे. पश्चिमेकडे मन्दाकिनीच्या किनाऱ्यावर केदारनाथ विराजमान आहेत. हे ठिकाण हरिद्वार पासून १५० मैल व ऋषिकेश पासून १३२ मैल दूर आहे.

कार्तिक ते चैत्र ह्या सहा महिन्यातच ह्याचे दर्शन घेता येते. कारण इतर महिन्यात ते बर्फाच्छादित असते.

केदारनाथाचे मंदिर आकाराने लहानच आहे. उंच चौथऱ्यावर दगडी बांधकाम आहे. इ. स. १०१९ मध्ये ह्या मंदिराचे काम भोजराजाच्या कारकिर्दीत झाले. पुढे १८०० च्या सुमारास देवी अहिल्याबाईंनी त्याचा जीर्णोद्धार केला.

सभामंडपात नंदी व भिंतीजवळ पांडवांच्या मूर्ती व कृष्णाची मूर्ती आहे. ह्या मंदिराचे शिखर सोन्याने मढविलेले आहे.

मंदिराच्या परिसरात अनेक पवित्र स्थळे आहेत. मागील बाजूस आद्यशंकराचार्यांची समाधी आहे. प्रस्तुत द्वादशज्योतिर्लिङ्ग स्तोत्राचे कर्ते शंकराचार्यच आहेत.

उपरोक्त श्लोकातील वृत्त-उपेन्द्र- वज्रा आहे. व्याक्ष्या-उपेन्द्रवज्रा प्रथमे लघौ सा। (सा म्ह. इन्द्रवज्रा)

गण- ज त ज ग ग.

यति - ५, ६ प्रकार - समवृत्त

प्रत्येक पदात ११ अक्षरे-अक्षरवृत्त.

क्रमशः।

इति शिवम्

**दि. दा. औटी**

●●●

प्रसाद औटी

पांडवांचा वनवास आणि अज्ञातवासाचा काल पूर्ण होऊन ते प्रकट झाले. मात्र ते अज्ञातवासातून एक वर्ष उलटायच्या आतच प्रकटल्याचा दावा दुर्योधन करू लागला! कोणाचंच तो ऐकेना. आकाशात युद्धाचे ढग जमू लागले. दोन्ही पक्ष सैन्याची जमवाजमव करू लागले. दुर्योधन बलरामाचा गदायुद्धातला पट्टशिष्य! तर श्रीहरी पांडवांचा पाठिराखा! बलाढय यादव सैन्य आपल्याच बाजूनं लढावं असं दोन्ही पक्षांना वाटत होतं. अखेर पांडवांच्या बाजूनं श्रीकृष्ण आणि कौरवांच्या बाजूनं यादवांचं सारं सैन्य अशी तडजोड झाली. त्यातही दोन्ही पक्ष आपले संबंधी असल्यानं कृष्णानं 'न धरी शस्त्र करी मी सांगेन युक्तिच्या गोष्टी चार!' अशी प्रतिज्ञा केली. मग अर्जुनानं त्याला विनंती केली, कृष्णा, तू बरोबर असलास तर तिन्ही लोक युद्धाला माझ्यासमोर उभे राहिले तरी मी आनंदानं त्यांचा सामना करेन. मात्र तू स्वतः युद्धभूमीवर माझ्या रथाचं सारथ्य करावंस! कृष्णानं त्याला आनंदानं संमती दिली.

दरम्यान धृतराष्ट्रानं पांडवांचा बुद्धिभेद करण्यासाठी संजयला इंद्रप्रस्थाला रवाना केलं. संजय धर्मराजाला सांगू लागला, युधिष्ठिरा, तात धृतराष्ट्रांच्या सर्व पुत्रांत एक तूच काय तो सदैव धर्माचं पालन करणारा आहेस. आपल्या कुळातील ज्येष्ठ व्यक्ती या नात्यानं सर्वांना योग्य मार्गदर्शन करणं तातांचं कर्तव्य आहे. म्हणून त्यांनी खास तुला धाडलेला निरोप घेऊन आज मी इथे आलोय.

राज्यलोभानं आपल्याच बांधवांशी युद्ध करणं यापरता आततायीपणा दुसरा नाही. युद्धात तुम्ही स्वतः मारले जाऊ शकता आणि नरकाचे धनी होऊ शकता. तुम्ही जरी जिंकलात तरी आपल्या बांधवांच्या, ज्येष्ठ आप्तांच्या आणि गुरुजनांच्या रक्तानं माखलेले भोग तुम्हाला कदापी सुखी करू शकणार नाहीत. आपल्याच कुलसंहाराचं पाप धुवून टाकायला हा आणि पुढचे कित्येक जन्म तुम्हाला असीम दुःखं भोगावं लागेल.

यापेक्षा एखादयानं तीर्थक्षेत्री व्रतस्थ होऊन केवळ भिक्षाटन जरी केलं तरी तो अक्षय शांती आणि आनंदाचा सहजच धनी होईल. 'अहिंसा परमो धर्मः' हे तुला सांगायची आवश्यकता नसली तरी धर्मराजा, तात या घडीला तुला त्या सवश्रेष्ठ धर्माची आठवण करुन देऊ इच्छितात. जगातील कोणतीही शक्ती, कोणतंही प्रलोभन तुला या धर्ममार्गापासून परावृत्त करू शकणार नाही असा त्यांना विश्वास वाटतो.

संजयाच्या या भाषणामुळे सारी राजसभा चक्रावून गेली. धर्मानं कृष्णाला विचारलं, कृष्णा, याबाबत तुझं मत काय आहे?

कृष्णानं म्हटलं, संजया, या मोक्याच्या क्षणी धृतराष्ट्रांना धर्माची आठवण झालेली

पाहून मला आनंदच होतोय! पण त्यांचा थोडा गैरसमज झालेला दिसतोय! पांडवांना युद्ध नकोय, न्याय हवाय. तो न्याय मिळवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद यांचा या अनुक्रमानं अवलंब केला तर ते क्षात्रधर्माला धरुनच होईल हे धृतराष्ट्रही मान्य करतील! दोन्ही बाजूंचा हितचिंतक या नात्यानं पांडवांना तो न्याय सामोपचारानंच मिळावा अशी माझीही इच्छा आहे. तो साम घडवून आणण्यासाठी मी स्वतः हस्तिनापुरास येणार आहे.

आणि मग लागलीच रथाला घोडे जोडून कृष्णानं हस्तिनापूर गाठलं...

**'श्रीकृष्ण शिष्टाई' – जाती पादाकुलक**

स्वये श्रीकृष्ण जरी सांगतो
परी / मुळी ना दुर्योधन मानतो ।।धृ ।।

कृष्ण वदे द्युति पांडव हरले
पांचालि तुम्ही सभेत छळले
नम्रतेस ना तरि ते त्यजले
वैभवा धर्मराज त्यागतो ।।१।।

सदैव ते अवमानित होता
देशोधडिला जरी लागता
अंगी असीम साहस असता
युधिष्ठिर पंचग्राम मागतो ।।२।।

मान्य नसे इतुकेहि कौरवा
अधर्म करुनी जाल रौरवा
युद्धाविण ना गती पांडवा
सुखाचा अंत समरी होतो ।। ३।।

टाळा युद्धा विनवि श्रीहरी
पाळा धर्मा विनवि श्रीहरी
राखा शांती विनवि श्रीहरी
कुलक्षय संगरी ना टळतो ।।४ ।।

विनाशकाळा भ्रष्ट हो मती
ना ऐके जे वडिल सांगती
नसे जाणली भीषण नियती
मागणे कौरव नाकारतो ।।५।।

दुर्योधन बोले कृष्णासी
युद्धाची मज भीति घालसी
क्षत्रीयांचे लग्न मृत्युसी
तयाला रणात कवटाळतो ।।६ ।।

राज्य कोठचे कुठली गावे
वनात त्यांनी सदा रहावे
सुईच्या अग्रावरती मावे
एवढया जमिनीस ना देतो ।।७ ।।

या परि अमुचा जरीच करशिल
बुद्धिभेद तू सजा पावशिल
मुकाट परतुनि जरि ना जाशिल
सत्वरी बंदिवास घडवतो ।।८।।

कृष्णाचं ऐकणं दूरच, उलट त्यालाच कारावासात टाकण्याची भाषा दुर्योधन बोलू लागला. नाईलाजानं कृष्ण सात्यकीसमवेत कौरवांच्या राजसभेतून बाहेर पडला. त्यानंतर विदुराघरी जाऊन त्यानं कुंतीची भेट घेतली आणि तिचं सांत्वन केलं.

हस्तिनापुराबाहेर त्यानं कर्णाची भेट घेतली. त्याच्या जन्माची कथा सविस्तर कथन करून तो म्हणाला,

कर्णा, मी तुला सत्य काय ते सांगितलं. त्याला तू धैर्यानं सामोरा जा, त्याचा स्वीकार कर. मग तुला तुझा मार्ग आपोआपच दृग्गोचर होईल.

कर्ण मान हलवत म्हणाला, कृष्णा, मी राधेय आहे आणि दुर्योधनाचा घनिष्ट मित्र आहे. सत्य सत्य जे काही असेल ते माझ्या दृष्टिनं एवढंच आहे. दुर्योधनाचा पक्ष त्यागून मी स्वप्नातही पांडवांच्या बाजूनं युद्धाला उभा रहाणार नाही. हे माझं म्हणणं तू काळया दगडावरची रेघ आहे असं समज!

कौरव आणि पांडव आपापल्या सैन्यांसहीत आता कुरूक्षेत्रावर युद्धासाठी एकमेकांसमोर उभे ठाकलेले आहेत. द्रोणांनी रचलेल्या व्यूहात त्यांच्या संगतीला पितामह भीष्म, कर्ण, कृपाचार्य, अश्वत्थामा, जयद्रथ, दुर्योधनासह त्याचे बंधू इत्यादी महान योद्धे उभे आहेत. पांडवांची बाजूही काही कमी नाहीये. द्रोणाचार्यांचाच प्रतिभाशाली शिष्य द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न त्यांचं सेनापतीपद सांभाळतोय. भीमार्जुनांबरोबर विराट, चेकितान, द्रुपद, कुंतिभोज, अभिमन्यू, घटोत्कचादी धुरंधर शस्त्रसज्ज आहेत. स्वतः श्रीहरी अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करतोय. शंख फुंकले जातायत, रणवाद्यं वाजवली जातायत, शस्त्रं परजली जातायत, सूचना दिल्या आणि लगबगीनं पाळल्या जातायत. घोडयांच्या खिंकाळण्यानं आणि हत्तींच्या चित्कारांनी वातावरण भरून गेलंय. कोणत्याही क्षणी लढाईला आता तोंड फुटू घातलंय.

अशा कल्लोळात अर्जुन कृष्णाला म्हणाला, हे अच्युता, दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी माझा रथ नेऊन उभा कर म्हणजे सर्व युद्धेच्छुंना मी एकदा नीट पाहून घेतो.

श्रीकृष्णानं त्याप्रमाणं रथ उभा केल्यावर अर्जुनाच्या दृष्टीला आपले चुलते, आजे, गुरू, भाऊ, मामे, पुत्र, नातू, मित्र, सासरे, आप्तेष्ट एकमेकांच्या नरडीचा घोट घ्यायला आतूर झालेले दिसले. त्या एका क्षणात हे आपण काय करतो आहोत आणि कशासाठी हेच त्याला समजेनासं झालं. त्याच्या गात्रातलं त्राणच हरपलं. जिभेला कोरड पडली. शरीर कंपायमान झालं. अंगावर शहारे आले. त्याला गांडीव धनुष्य धड हातात धरता येईना, स्थिर उभंही रहाता येईना. असा तो आर्त अर्जुन आपल्या स्थितीचं कृष्णाजवळ वर्णन करत, शोकाने विव्हलमानस होऊन, हातचे धनुष्यबाण टाकून देऊन, रथात आपल्या जागी स्तब्ध बसला...

**'अर्जुन विषादयोग' – वृत्त मंदाक्रांता**

युद्धाच्या त्या कठिण समयी सारथी चक्रपाणी
सैन्यांमध्ये रथ करि उभा नीट होण्या पहाणी
देखोनी आप्तजन युयुत्सू पार्थ दुःखीत झाला
टाकोनी भूवरि धनुस तो आर्त होता म्हणाला
।।१।।

गोपाला हे जरिच अवघे मूढ होवोनि गेले
शस्त्रांनी हे सुहृद वधण्या काय म्या पाप केले
सांगे तूची मज झडकरी का त्यजू मी विवेका
जिव्हेसी दंत क्षत करता कोण त्या पाडतो का
।।२।।

संग्रामी या कुलक्षय करी हो विजेता धनी तो
त्रैलोक्यीचे मिळुन सुखही रौरवी खास जातो
आता काही मज गमतसे टाळण्या हीच हानी
जावे आम्ही मरुन समरी वा सुखे आडरानी
।।३।।

ना सारासार मुळिच कळे भ्रांत चित्तात झालो
जाणोनी मी शरण तुजला शिष्य भावेच आलो
भक्तांचा तारक जरिच तू धाव पंचानना रे
प्रीती शब्दे निरसन करी मोह हा सत्वरी रे
।।४।।

ऐन युद्धाच्या प्रसंगी अर्जुन विषादानं युक्त झालेला पाहून श्रीकृष्ण सखेदाश्चर्यानं त्याला संबोधता झाला,

तुझे आप्त मरण पावतील म्हणून तुला दुःख होतंय. पण मला सांग, जे जन्माला आले आहेत ते आज ना उदया मृत्यू पावतीलच! एवढंच नव्हे तर जे मृत्यू पावले ते फिरून जन्म घेतील. हे निसर्गनियम तू विसरलास काय? बरं अगदी जरी हे तुझ्या हातून मृत्यू पावले तरी धर्मरक्षणासाठी, कर्तव्यपालन म्हणून, न्यायप्राप्तिसाठी, स्वसंरक्षणार्थ, नैसर्गिक अशा क्षुधेच्या शांतीसाठी किंवा सर्व भूतांच्या हितासाठी केलेली हिंसा ही शास्त्रमान्य आहे. नव्हे, मी तर म्हणेन की सर्वोच्च प्रतीची अहिंसा ती हीच! अशा कित्येक वीरांना यापूर्वी तू समरांगणात यमसदनाला पाठवलं नाहीस काय? मग आजच यहे माझे आप्तफया मोहाने व्याप्त होऊन तू क्षत्रियाचा धर्म का त्यागतो आहेस?

अरे, क्षत्रिय म्हणजे यक्षतात् त्रायते इति क्षत्रियःफ सर्वसामान्यांचं आपल्या प्राणपणानं जो समाजातील वाईट प्रवृत्तींपासून रक्षण करतो तो क्षत्रिय! तोच धर्म त्यागून तू रणांगणाला पाठ दाखवलीस तर मग लोक काय म्हणतील? भरतकुलास ते शोभादायक होईल काय? दुष्टनिर्दालन हे ज्यांचं आदय कर्तव्यच आहे अशा तुझ्यासारख्या समर्थांनीच अन्यायाविरुद्ध हातपाय गाळले तर मग सर्वसामान्यांनी काय करावं, अन्यायनिवारणासाठी, अधर्मनिर्मूलनासाठी कोणाच्या तोंडाकडे पहावं? जगरहाटी मग कशी चालावी?

बरं अगदी तू स्वतःच या समरात मारला गेलास तरी दुष्किर्ती मिळवून कुढत कुथत चरफडत कसंतरी जगण्यापेक्षा ते सुसहय नाही काय? तुझ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून असे सहस्त्रावधी अर्जुन उदया समाजहितार्थ उभे रहाणार नाहीत काय? चांगल्या भावनेनं मनापासून केलेल्या विहित कर्माने खुद्द तूही स्वर्गलोकातच जाशील की नरकात?

लक्षात घे की खलप्रवृत्ती हा समाजपुरुषाच्या शरिराला झालेला रोग आहे. सारं शरीर वाचवायला आपण रोगग्रस्त अवयव क्वचित छेदून टाकत नाही काय? समजा आपण त्यावेळी यहा माझाच अवयव मीच कसा छेदू?फ म्हणून योग्य कृती केली नाही तर तो अवयवच काय पण सर्व शरिरच नष्ट होणार नाही काय?

म्हणून तू ऊठ आणि निखळ सत्याला स्मरून युद्ध कर! ते सोडलंस तर तुझ्या

वाटयाला ऐहिक आणि पारलौकिक दुःखाखेरिज काही येणार नाही. ते केलंस तर त्यातून जे काही निष्पन्न होईल ते चांगलंच असेल. त्यामुळं आपोआपच परिणामांची चिंता करण्याची तुला आवश्यकता रहाणार नाही, तू खऱ्या अर्थानं निष्काम कर्म करशील, तू स्थितप्रज्ञ होशील, कामक्रोधादी विकार तुझ्या चित्तातून आपणहून आपला मुक्काम हलवतील. अशा तऱ्हेनं जीवनातला प्रत्येक क्षण त्या क्षणी नैसर्गिकरित्या प्राप्त झालेलं कर्तव्य करण्यात घालवलास तर त्या कर्माची सुमधुर फळं निरंतर चाखून तू अगदी माझ्यासारखाच परमानंदाचा धनी होशील! कायम त्या आनंदसागरात डुंबत राहशील, अगदी एकाकार होऊन जाशील! जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्यास आणि खऱ्या अर्थानं सुंदर जीवन जगण्यास पात्र होशील!

अर्जुना, हे जीवनरहस्य मी यापूर्वी फक्त विवस्वानाला कथन केलंय. तेच राजगुहय आज मी तुला तुझा गुरू, मित्र, हितचिंतक आणि शुद्ध विश्वात्मा या नात्यानं सांगतोय. आत्तापर्यंत ऐकलेली सर्व उलटसुलट शिकवण विसर आणि फक्त मी सांगतोय त्याच्यावरच विश्वास ठेव! प्रत्यक्ष मी तुझा पाठिराखा आहे हे सदैव स्मरणात ठेव, ऊठ, निःशंकपणे गांडीव धनुष्य उचल आणि युद्ध कर...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

**तस्माज्ज्ञानमयो भव।**[३८५]
**पदच्छेद – तस्मान + ज्ञानमयः भव।**

सुभाषितकार म्हणतात म्हणून तू ज्ञानी हो कारण –

**ज्ञानवान् एव सुखवान्**
**ज्ञानवान् एव जीवति**
**ज्ञानवान् एव बलवान्...**

**विकृतिं नैव गच्छन्ति संगदोषेण साधवः।**[३८६]

वाईट संगतीत राहूनही सज्जनांचा स्वभाव बदलत नाही.

दुसरी ओळ –

**आवेष्टिंत महासर्पैश्चदनं न विषायते।।**

चंदनाचे झाड विषारी सापांनी वेढलेले असते. पण ते विषारी होत नाही.

कृतज्ञता : वरील सुभाषिते प्रा. रा. वा. कोल्हटकर यांच्या 'सुभाषित दैनंदिनी' या संग्रहातून घेतली आहेत.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## मनुष्य स्वभाव, वागणूक, आणि रोजचे जीवन, संघर्ष्य

**श्री. प्रकाश दीक्षित**

प्रत्येक प्राणिमात्र, प्रामुख्याने मनुष्य प्राणी जन्माला येताना, कमी अधिक प्रमाणात बुद्धी, विचार शक्ति व स्वभाव हे गुणावगुण सोबत घेऊन जन्म घेत असतो. डोळे उघडल्या क्षणापासून सुरू होणारा जीवन सांघर्ष शेवटी अखेर शेवटचे डोळे मिटे पर्यंत सुरूच असतो. त्या व्यक्तीस या प्रवासात येणारी यशापयशे, अनुभव,व्यक्तीगत स्वभाव धर्म यातून त्याचे जीवन घडत जाते. हे घडत असताना शांत डोके ठेवणे व सदसादविवेक बुद्धीस स्मरून वागणूक ठेवणे. या दोन गोष्टीच त्याच्या हातात असतात. बाकी सर्व गोष्टीवर त्याचे नियंत्रण नसते. कष्ट, सातत्य, व निश्चय या जोरावर तो कांही प्रमाणात तो यश मिळवू शकतो. पण हेही नियतीची साथ मिळण्यावरच आवलंबून असते. एक सर्व साधारण अंगठा नियम (Thumb Rule) म्हणून दुसर्याने जसे वागू नये असे आपणास वाटते, तसे आपण दुसऱ्याशी न वागणे हा साधा नियम पाळला गेला तर यात अधिक याश मिळू शकते. पण नियतीवर मत सहसा कराता येत नाही.

प्राचीन कालापासून भारतीय संस्कृतीने जे शोधले गेले व सापडले ते सामान्यासाठी संस्कृत सुभाषितांच्या माध्यमातून लिहून ठेवले आहे. जसे –

विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेषां परिपीडनाय ।
खलस्य साधोर्विपरीतमेतत् ज्ञानाय दानाय च रक्षणाय ।।

विद्येचा (ज्ञानाचा) उपयोग विवाद करण्यासाठी, धनाचा (संपत्तीचा उपयोग मद (माज) करण्यासाठी व शक्तीचा उपयोग दुसऱ्याला पीडा (त्रास) देण्यासाठी दुर्जन लोक करतात तर सज्जन (साधू) याचा उपयोग अनुक्रमे दुसर्याला देण्या (वाटण्या) साठी, धनाचा (संपत्तीचा उपयोग दुसर्याला दान देण्यासाठी व आपल्या शक्तीचा (ताकदीचा) उपयोग इतरांच्या संरक्षणासाठी करतात. हा दोघातला फरक आहे.

म्हणूनच ते संगतात –

दुर्जनम प्रथम वन्दे सज्जनम्  तदनंतरम् ।
मुख प्रक्षालनात पुर्वम् गुदा प्रक्षालनात वरम्।।

दुर्जनांना प्रथम वंदन करावे व त्या नंतर सज्जनास वंदन करावे जसे मुखप्रक्षालना आधी गुड प्रक्षालन करणे चांगले.

पिंडे पिंडे मातीर् भिनाः या तत्वानुसार प्रत्येक पिंडाची (व्यक्तीची) बुद्धी,शरीररचना, स्वभाव गुण दोष भिन्न असतात. म्हणूनच दोन व्यक्तींनी आपआपल्या गुणांची बेरीज व दोषांची वजाबाकी काशी साधता येईल याचा विचार करून आपली वागणूक सुधारण्याचा प्रयत्न करत राहाणे महत्वाचे ठरते. प्रत्येकजण आयुष्यात क्वचितच गुणाकार व प्रसंगी भागाकर करत असतो. पण प्रत्येक

वेळी तो बेरीज वजाबाकी करतच आयुष्यात पुढे जात असतो. वस्तूत: त्याला गुणाकार वा बेरीज अपेक्षित व हवी असते. पण गणितात वजाबाकी व भागाकार ही असतात हे तो विसरतो. आयुष्याचे गणित देखील गणिती नियमच वापररते.

वरील तत्वाप्रमाणे दोन व्यक्तीची मानसिकता, सहनशीलता, अहंकार व विश्र्वास वेगवेळे असतात. आई, वडील – भाऊ, बहीण एक एकमेकास त्यांच्या जन्मा पासून जवळ असल्याने अधिक चालवून घेणे व सहनशीलता धाखावू शकते. पण दोन व्यक्तीचा विवाह झाल्यावर निर्माण होणारी नवीन नाती (आपापल्या सासरची) आपल्या घरातील माणसे आपली मानसिकता, सहनशीलता, अहंकार व विश्वास तसाच स्वीकारतील अशी अपेक्षा करणे योग्य नाही. असे असेल तर तो अपवादाने हा नियम सिद्ध करणारा ठरेल. अधिकांशी वेळा असे घडत नाही. म्हणूनच कमी अधिक प्रामानांत तडजोड करणे हा या वर उपाय ठरतो. कारण आई, वडील – भाऊ, बहीण निवडण्याचा अधिकार कोणाही नाही. नवरा वा बायको व त्या बरोबर येणारी नाती निवडण्याचा अधिकार व्यक्तीस एकदाच मिकतो तो त्याला मृत्यू पर्यंत बहुतेक सर्वांनाच निभावावाच लागतो. असे करत असताना, कै. कवीवर्य मंगेश पाडगांवकर म्हणतात त्या प्रमाणे हसत हसत जगायचे का रडत रडत हे ज्याचे त्याने ठरवायचे असते व त्यातून मिळणारे सुखदुख: स्वत: मिळवावयाची वा भोगायची असतात. हे करण्यासाठी गरज असते ती वेळ प्रसंगी आपापली मानसिकता, सहनशीलता, अहंकार व विश्वास बाजूला सारण्याची मनाची तयारी असावी नसल्यास करावी लागते. तसे झाले तर जास्तीत जास्त माणसे सुखी होतील ज्यातून समाजात सुख समाधान नांदेल. वरील गणिती नियम नियतीत देखील वापरले जाताना दिसतात. म्हणूनच आता संयुक्त कटुंब पद्धती लयाला यात असताना, ज्या मुळे यातील कांही गोष्टी घडताना कुटुंबातील जेष्ठ सदस्य यात लक्ष घालून मार्ग काढत असत. त्या मुळे हुशार व कमी हुशार वा ढ कौटुंबिक सदस्यांचे जीवन सुखी होत होते. आता तसे होताना दिसत नाही.

विसाव्या शतकांत झालेली औद्योगिक क्रांती, सामाजिक सुधारणा व बदल यामुळे झालेले दूरगामी परिणाम आता एकविसाव्या शतकाच्या सुरवातीस आपल्या समोर प्रश्न उभे ठाकले आहेत. गेल्या शतकाचा पूर्वाधात समाजातील आध्यात्मिक मोडत गेली व उत्तरार्धत त्याची जागा कर्म कांदे व दिखाऊ अध्यात्माने घेतली. याचे प्रमुख कारण पैसा काहीही मिळवू शकतो ही भावना समाज मनांत रुजवली वा रुजली गेली. या बाबत कोणताही विचार गांभिर्याने झालेला दिसत नाही. तसा तो होणे ही आज काळाची गरज आहे. वसुधैव कुटुंबकम ची आपली संस्कृती आहे असे जगाला ओरडून सांगत असताना, सध्या आपली कुटुंबे बेटे बनत आहेत ही वस्तुस्थिती काशी विसरून चालेल. व यातून

(पृष्ठ २८ वर)

(उर्वरीत लेख मागील अंकापासून पुढे...)

श्रीगणेशाचे ज्येष्ठ बंधू कार्तिकेयांना स्वात्मसंचित उपदेश भगवान श्रीदत्तात्रेयांनी केला व तो उपदेश 'अवधूत गीता' म्हणून प्रसिद्ध आहे.

श्रीभगवान दत्तात्रेयांची पूर्ण कृपा झालेल्या प्रमुख व्यक्ति येणेप्रमाणे आहेत - श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, श्रीस्वामी समर्थ (अक्कलकोट), जनार्दन स्वामी, माणिकप्रभू, दासोपंत, एकनाथ महाराज, साईबाबा, कीनाराम अघोरी, श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेंबे स्वामी), नीलकंठ इ. इ. तसेच मुस्लीम संत - श्रीआलम, श्रीबक, श्रीशाहमुती, श्रीसाईदीनदर्वेश इ.इ. व नंतर श्रीयोगानंदसरस्वती, श्रीरंगावधूत, श्रीचक्रधर, नारायण महाराज केडगांवकर, श्रीनिरंजनरघुनाथ, पंत बाळेकुंद्रीकर महाराज, बीडकर महाराज, दिगंबरास इ.इ. आहेत. असे दत्तकृपा झालेले परमार्थाचे अधिकारी झाले, आताही आहेत व पुढेही होतच रहाणार आहेत. कारण भगवान श्रीदत्तात्रेय कल्पांतापर्यंत राहणारे आहेत.

भगवान श्रीदत्तात्रेयांकडून भार्गवरामांनी (परशुरामांनी) 'भगवती त्रिपुरसुंदरीमाहात्म्य' श्रवण करून तिची विधीपूर्वक उपासनेसाठी दीक्षा ग्रहण केली व १२ वर्षे तपश्चर्या केली. भगवान दत्तात्रेय व भार्गवराम यांचा संवाद त्यात आहे, तसेच दत्तात्रेयांनी भार्गवरामास (परशुरामास) केलेला उपदेश तसेच श्रीविद्या उपासना, त्रिपुरसुंदरी माहात्म्य इ.इ. चे ज्ञान दिले ते आहे.

दत्तोपदेशानी परिप्लुप्त असा १८००० (अठराहजार) श्लोकांचा मोठा ग्रंथ होता. त्याचे नाव होते 'दत्तसंहिता'. श्रीपरशुरामांनी स्वतः त्याचे अध्ययन करून त्याचे ६००० सूत्रात सार काढले होते. हा ग्रथ ५० खंडात विभाजित असून परशुरामशिष्य सुमेधा यांनी ही दत्तसंहिता व सूत्रसारांश पुढे 'त्रिपुरारहस्य' म्हणजेच 'दत्त-भार्गव संवाद' या नावाने संग्रहीत केला.

भगवान दत्तात्रेयांबद्दल अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत त्यातीलप्रमुख प्रसिद्ध ग्रंथ असे - 'श्रीगुरुचरित्र, अवधूतगीता, जीवनमुक्तगीता, त्रिपुरा रहस्य, काथबोध, अद्भुतगीता, विद्यागीता, दत्तात्रेययोगशास्त्र, दत्तप्रबोध, दत्तात्रेय तंत्र, दत्तात्रेयचंद्रिका, दत्तात्रेयसर्वस्व, दत्तात्रेय-महापूजावर्णना, दत्तात्रेय-नीतिगद्य, योगगीता, दत्तगीता, दत्तात्रेयमाहात्म्य, श्रीगुरुलीलामृत, श्रीगुरुसंहिता, सिद्धांत बांध, योगराजतिलक, ज्ञान-दीप-बांध व काही कारणाने अद्यापही न प्रकाशित झालेले (अप्रकाशित) ग्रंथ - दत्त-गोरक्ष गीता, अद्वैतश्रुतीसार, दत्तगोरक्षकवच, दत्ताविनाशी संवाद, दत्त-गोरक्ष उपनिषद.

भगवान दत्तात्रेयांनी भारतभर भ्रमण करून मुमुक्षांना उद्धरिले आहे. त्यामुळे त्यांची महती सर्व भारतात आहे व ठिकठिकाणी

त्यांची देवस्थाने / तीर्थस्थाने आहेत – आसेतू – हिमाचल. त्यातही जी प्रसिद्ध आहेत, शक्तिपीठे आहेत. त्यांची स्थळनिहाय यादी (संक्षिप्त) अशी –

सौराष्ट–गिरनार, राजस्थान–अबुपर्वत, नर्मदातीरी–अनुसुधातीर्थ, गरुडेश्वर, नारेश्वर, म्हैसूरात–कडूर जिल्ह्यात–'चंद्रद्रोणगिरी'. गोव्यात–साखळी, त्रिवेंद्रम–सुचिंद्रम, उत्तरप्रदेशात–बांदा जिल्ह्यात–चित्रकुटजवळ –अनुसुया आश्रम, बद्रीनाथ केदारनाथ यात्रेतील तुंगनाथजवळ मंडलचट्टी डोंगरापासून थोड्या अंतरावर – 'अत्रिअनुसुयाश्रम', महाराष्ट्रात–नरसोबा वाडी, औदुंबर, गाणगापूर, आंध्रात–कुरगुड्डी, उत्तरप्रदेशात–वाराणशी याशिवाय पीठापूरम माहूर इ.इ. विस्तारभयास्तव सर्व यादी देता येत नाही.

शिवाय अनेक गावात दत्तमंदिरे आहेतच हे सांगणे नलगे.

भगवान श्रीदत्तात्रेयांचे कार्य सर्व भारतदेशात आहे. दत्तसंप्रदाय असे मानतो की 'भगवान दत्तात्रेय माहूर क्षेत्री–विश्रांती व निद्रा यासाठी, वाराणशीत–गंगास्नानास, कऱ्हाडक्षेत्री–अर्थ्यदान व प्रातःसंध्येसाठी, कोल्हापूरात (करवीक्षेत्री) – भिक्षा मागण्यास, पांचालपुरात–भिक्षान्न भोजनास असतात. तसेच ते पंढरपुरात तिलक धारण करतात, गंध लावतात, गाणगापुरात– भीमा–अमरजा संगमी–योगसाधना करण्यास, कुरुक्षेत्रावर–स्वमन्तक तीर्थावर आचमन करतात. अशी सूर्योदय ते सूर्यास्त त्यंची अखिल भारत भ्रमंती असते. भक्तीभावाने त्यांचे स्मरण करणाऱ्या भक्तांचे ते अगदी निकटच असतात. (स्मर्तृगामी म्हणतात त्यांना म्हणजे स्मरण करताच प्रगट होता). त्यांची दिनचर्या 'दत्तात्रेय वज्रकवच' ग्रंथात दिलेली एका श्लोकात सांगितली आहे तो श्लोक येणेप्रमाणे –

**'वाराणसीपुरस्नायी कोल्हापूर जपादरः।**
**माहुरीपुर–भिक्षाशी सह्यशायी दिगंबरः।।'**

भगवान श्रीदत्तात्रेयांची भक्तवत्सलता अपरंपार आहे. त्याविषयी त्यांच्याच शब्दात ते सांगतात तो श्लोक असा आहे –

**'अभक्त्या वा सुभक्त्या वा यः स्मरेन्मामनन्यधीः।**
**तदानीं तमुपागत्य ददामि तद्भीप्सितम्।।'**

याचा अर्थ – अभक्त असो वा सुभक्त असो, त्याने माझे अनन्यभावे मनी स्मरण करताच त्याचेसाठी मी लगेच उपस्थित होवून त्याचे मनोरथ पूर्ण करतो.

भगवान दत्तात्रेयांची जयंती देखील 'मार्गशीर्ष' महिन्यात येते जो महिना प्रत्यक्ष श्रीकृष्णांचा आहे भगवद्गीतेतील अध्याय १० श्लोक ३५ मध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात तो श्लोक असा आहे –

**'बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम्।**
**मासानां मार्गशीर्षेऽहमृतूनां कुसुमाकरः।।'**

(मार्गशीर्ष हा महिना श्रीकृष्णांचा आवडता आहे किंवा श्रीकृष्ण म्हणतात तो महिना म्हणजे मीच आहे.) याच महिन्यात त्यांनी भगवद्गीता सांगितली आहे. एवढेच नव्हे तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमाऊलींनीही याच महिन्यात भगवदगीतेवरील त्यांची टिका/ग्रंथ 'ज्ञानेश्वरी' पूर्ण केली लिहून. दत्तजयंती मार्गशीर्ष पौर्णिमेस साजरी करतात. त्याआधी सात दिवस अनेक दत्तभक्त गुरुचरित्रपारायण

करतात. दत्तावतार नृसिंह (नरसिंह) सरस्वतीचे चरित्र गुरुचरित्र म्हणून भक्तिभावाने वाचतात. यातून जो भक्तिविचार मिळतो तो परमार्थाकडे नेणारा आहे. दत्तभक्तिचा हा मार्ग सात्विक विचारातून आत्मिक कल्याणाचा आनंददायी पथ आहे ज्यातून कर्ममार्ग व ज्ञानमार्गाचाही बोध होतो. श्रीपाद श्रीवल्लभ व नृसिंह (नरसिंह) सरस्वती व श्रीस्वामी समर्थ यांचे चरित्र पारायण करतात त्यांचे भक्त या सात दिवसात.

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा किंवा अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त, वा श्रीस्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ असे जयजयकार श्रद्धेने करतात.

नाथसंप्रदायातून (प्रामुख्याने) दत्तभक्ती उगम झाला आहे. मच्छिंदादि नवनाथ ते ज्ञानेश्वरांपर्यंत ही परंपरा अत्यंत कठोरपणे व प्रखर साधनेमुळे / साधनेने अवतीर्ण झाली आहे. सर्व विकार त्यागून साधना केली तर आत्मोन्नती लवकर होते याची जाणीव साक्षात दत्तात्रेय भगवानांनी अवधूतगीतेत सांगितली आहे (करून दिली आहे) उपदेशाद्वारे. भगवद्‌गीता व अवधूत गीतेत साम्य दिसते विचारांचे.

जिथे अखंड दत्तभक्ती तिथे समाधान, संपत्ती अखंड असते असा दिलासा गुरुचरित्रातून मिळतो.

असे हे भगवान दत्तात्रेय भक्तांवर सदैव कृपा करोत. दत्तोपासना आपण जर निरहंकारी, निर्व्याज्य, निर्मळ, निष्काम अंतःकरणाने कराल तरच दत्तकृपेचा आपणास अनुभव येईलच लेखांतील भगवान दत्तात्रेयांचे वेगवेगळ्या स्तोत्रांतून घेतलेले ध्यान श्लोक देतो. तयातील कोणताही श्लोक म्हटला सतत तरी फळ निश्चित मिळणारच. ते श्लोक असे –

**दत्तात्रेय हरे कृष्ण उन्मातानन्वदायक।**
**दिगंबर मुने बालपिशाच ज्ञानसागर।।**
**दत्तात्रेयं शिवं शान्तं इन्द्रनीलनिभंप्रभूम।**
**आत्ममायारतं देवं अवधूतं दिगंबरम्।।**
**ज्ञानयोगनिर्धी विश्वगुरुं योगितनप्रियम्।**
**भक्तानुकंपिनं सर्वसाक्षिणं सिद्धसेक्तिम्।।**
**दत्तात्रेयो महायोगी भगवान भूलभावना।**
**चतुर्भुजो महाविष्णु योगसामाज्रदीक्षितः।।**
**जगदंकुरकंदाय सच्चिदानंदमूर्तये।**
**दत्तात्रेयाय योगिन्द्रचंद्राय परमात्मने।।**
**दिगंबरं भस्मविलेपिताङ्गम बोधात्मकं मुक्तिकरप्रसन्नम्।**
**निर्मानसं ज्ञानतनुंभजेऽहं दत्तात्रेयं ब्रह्मसमाधियुक्तम्।।**
**अवधूत सदानन्द परब्रह्मस्वरुपिणे।**
**विदेह देहरुपाय दत्तात्रेय नमोऽस्तुते।।**
**स्वमैवैक परब्रह्म सच्चिदानंदअव्दयम।**
**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं दत्तात्रेयं जगद्‌गुरुम्।।**

हा लेख श्रीभगवान दत्तात्रेयांना अर्पण करतो. यात काही उणीवा असतील तर ते माझे नेणतेपण/अज्ञान क्षमस्व. भगवान श्रीदत्तात्रेय आपणास प्रसन्न होवून आपले मनोरथ पूर्ण करोत ही नम्र प्रार्थना करून लेख समाप्ती. इत्यलम्.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

## कौटिल्यीय अर्थशास्त्राचे ब्रीदवाक्य : यथापराधं दण्ड : जेवढा अपराध तेवढी शिक्षा

डॉ. प्रभाकर आपटे

कौटिलीय अर्थशास्त्राची मांडणी गद्य आहे आणि शैली अशी आहे : आधी वेगवेगळ्या अर्थशास्त्रांची मेते द्यायची आणि शेवटी म्हणायचे न इति कौटल्यः। म्हणजे कौटल्य म्हणतो तसे नाही! कौटिल्याने एकदा अर्थशास्त्रीय सिद्धान्त देवून ‘अमुक राजा या राजनैतिक सिद्धान्ताप्रमाणे वागला नाही म्हणून त्याचा नाश झाला’ आणि अमुक राजा या राजनैतिक नियमानुसार वागला म्हणून त्याची भरभराट झाली अशी उदाहरणे देतो. या माहितीच्या आधारे कौटिल्याचे पूर्वसूरी राजनैतिक चिंतक आणि राजे यांचा निदान ३ शतकाचे इतिहास पुनरचित करणे शक्य होईल. Predecessors of Kautilya हा मुद्दा कौटिलीय अपराध आणि शिक्षा या विषयावर पीएच.डी करणाऱ्या डॉ. शशिरेखा उस्मानिया विद्यापीठाच्या निवृत्त विभागप्रमुख आहेत आणि त्याच्या पुस्तकाचे शीर्षक आहे 'Crime and punishment in Arthashastra.' त्यानी मोठे कोष्टकच दिले आहे. त्यात काही मजेदार गोष्टी आहेत. Adultry म्हणजेच वैवाहिक व्यभिचार यासाठी दण्ड आहे ५० पण आणि देवळाच्या हत्तीवर विना अनुमती चढून बसण्यासाठी ५०० पण दण्ड. हे विचित्र वाटते. पण विचार केल्यावर कदाचित असे असेल कां? की देवळातला हत्ती हा सामान्य माणसाच्या कक्षेच्या पलिकडे ठेवण्यासाठी हा दण्ड ठेवला असेल.

कौटिलीय अर्थशास्त्रात पदार्थांची भेसळ, विशेषतः राजाच्या अन्नातला संभाव्य विषप्रयोग इ. अनेक गोष्टी आहेत. तळघरात तीन मजल्यापेक्षा अधिक मजले बांधू नयेत व बांधण्यापूर्वी परिसरातील विहीरींची पातळी तपासली. मध्यप्रदेशचे निवृत्त मुख्यअभियंता डॉ. चिंतामण कांड यांच्याकडे अभिप्रायार्थ डॉ. र. पु. कुलकर्णी यांचा कौटिलीय अर्थशास्त्रातील स्थापत्य हा महाराष्ट्र राज्य ग्रंथरचना विभागाच्या या ग्रंथाची संहिता गेली असता त्याना इंदूरच्या एका underground shopping complex मधील पाणी हटत नव्हते अशी अडचण नोंदवणारा फोन आला. तेव्हा त्यानी ताबडतोब परिसरातील विहीरीची पाण्याची पातळी तपासायला सांगितली आणि नंतर आधुनिक उपाय केले.

यथापराध दण्डः या सूत्रातील कौटिल्याने सुचवलेला एक कठोर उपाय असाः उपनिषद् योगः याचा अर्थ हेरगिरि करायला पाठवलेला एकादा हेर शत्रूला फितूर झाला तर त्याचा गुप्तपणे कसा वध करावा ते तंत्र. इथे उपनिषद म्हणजे गुपचूप आणि योग म्हणजे खातमा Secret liquidation. अन्यत्र शत्रूच्या एखाद्या हेराला कसे संपवावे याची युक्तिः मुडजटिलव्यञ्जने वा मदनरसाभियोगेन अभिरंदध्यात्। म्हणजे त्याला एकतर मुण्डन केलेला भिक्षु किंवा जटाधारी साधूच्या वेशात भुलवावे आणि गुंगीचे औषध द्यावे आणि त्याला गाफिल करून ठोकावे. अशा अनेक गोष्टी कौटिलीय अर्थशास्त्रात आहेत. याचे हस्तलिखित बऱ्या शतकानंतर ते गणपतींना तिरुअन्तपुरम्च्या कार्यावहम येथील

हस्तलिखित संग्रहात सापडले आणि त्याचा इंग्रजी अनुवाद शामशास्त्री आणि मुंबई विद्यापीठातील प्रा. र. प. कंगले यांनी केला. मात्र, युरोपात त्याचे पहिले भाषांतर रशियन भाषेत झाले. यथापराधं दण्डः याचे फ्रेंच Jurisprudence मध्ये Legitime असे भाषांतर होते. त्यातून इंग्रजीत legitimate हा शब्द आला आहे. Ludwick Sternbach नावाचे एक पोलिस स्कॉलर होते. त्यांनी LL.D. म्हणजे Doctor of Laws ही पदवी मिळवली होती. Jean Filliozat यांनी जशी Le Medicin Indian इथून आयुर्वेदाच्या संशोधनाला सुरुवात केली आणि पुढे III world Tamil Conference मध्ये Sanskrit आणि Tamil यांचा संबंध दाखवणारा निबंध सादर केला. तसे Sternbach यांनी Juridical studies in Ancient Indian या मालिकेने सुरुवात करून शेवटी होशियार पूर येथून महासुभाषित संग्रह प्रसिद्ध केला. अन्तकाळी ते पॅरिसमध्ये भाड्याच्या घरात रहात होते आणि ९० व्या वर्षी एकाकी निधन पावले. त्यांनी त्यानंतर कौटिलीय अर्थशास्त्राचा अभ्यास केला. मग कौटिलीय अर्थशास्त्रातील सुभाषिते संकलित केली. निधनानंतर त्यांचे मृत्यूपत्र शाबित करायला Piere Filliozat ना खूप सरकारदरबारी खेटे घालावे लागले. कारण ते फ्रेंच नव्हते. शेवटी त्यानी होशियारपूर विश्वेश्वरानंद संशोधन संस्थेचा भली मोठी रक्कम मिळवून दिली.

**कोशशास्त्र**

भास्कराचार्यांनी पाणिनीच्या आधी वेदातील शब्दांचा निघण्टु रचला आणि नंतर त्यावर व्युत्पत्तिपर विकासग्रंथ लिहिला. निर्+वच पासून निर्वाचन हे नाम त्याचा अर्थ व्युत्पत्ति. व्युत्पन्न शब्दांचा संग्रह म्हणजे विकास. त्यानंतर कोशशास्त्रातला मोठा टप्पा म्हणजे अमरसिंह रचित अमरकोश. शब्दानुशासन त्यावर टीका उपलब्ध आहे. त्यानंतर इ.स. पहिल्या आणि दुसऱ्या सहस्रकात अनेक श्लोकबद्ध कोश आले. अमरकोशात वेगवेगळ्या विषयांची वर्गवारी आहे. म्हणजे हा विषयकोश किंवा विश्वकोश आहे. विशिष्ट ज्ञानशाखेला वाहिलेले कोश म्हणजे गणितनाममाला, तन्त्राभिधानकोश शिल्परत्नकोश वैद्यकसिंधु इ. संस्कृतेपर अभिजात भाषातील कोश म्हणजे पाइयेशद्दमहार्णव हा पालिकोश, पाकटखद्द... हा प्राकृतकाश. हे बहुतांश प्राचीन कोश हे श्लोकबद्ध आहेत. पाश्चात्य पद्धतीने रचलेलापहिला संस्कृत इंग्रजी कोश १८ व्या शतकात झाला. नंतर १९ व्या शतकाच्या चौथ्या ते सहाव्या दशकापर्यंत संस्कृत-जर्मन Petersberg worterbuch हा सप्तखंडात्मक Bothlink Roth रचित कोश. त्यासाठी या प्राध्यापक जोडीने रशियाच्या झारराजाकडे अशी वकिली केली की संस्कृत जर्मन कोशाच्या साहाय्याने आम्ही ख्रिश्चन वाड्मय संस्कृतमध्ये रचू आणि त्यातून भारतात ख्रिस्तीधर्मप्रचार करू. त्या हेतूचे फलित शून्य पण त्यानंतर १९ व्या शतकाच्या मध्यास Monier William यांची Sanskrit English Dictionary प्रसिद्ध झाली आणि त्याच्या मदतीने डेक्कन कॉलेजमध्ये टिळक आगरकर आणि प्राचार्य वामन शिवराम आपटे हे १८०३ ते १८७७ या काळात शिकले. पुढे वामन शिवराम आपटे यांनी Students Dictionary

संस्कृत इंग्रजी, १८८५, Practical St. Dictionary १८९० आणि रचली. हा महापुरुष १८९२ च्या ९ ऑगस्टला ३४ व्या वर्षी निधन पावला. त्यावेळी त्याच्या अंत्यविधीसाठी त्याच्या पत्नीजवळ पुरेसे पैसे नव्हते.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस अकारादिक्रमाने शब्दरचना केलेला शब्दकल्पद्रुम हा एकभाषी प्रसिद्ध झाला आणि १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात वाचस्पत्यम् हा ही एक भाषा कोश प्रसिद्ध झाला. २० व्या शतकांत अनेक द्वैभाषिक त्रैभाषिक संस्कृतकोश निर्माण झाले आणि १९ व्या शतकाच्या द्वितीयार्धात नरवणे रचि सोळा भाषांचा कोश निर्माण झाला. १९४३ साली डेक्कन कॉलेजचे डायरेक्टर सुमंत मंगेश कत्रे यांनी Thessaurns Linguae Sanskritae नावाचा लेख युरोपीय जर्नलमध्ये प्रसिद्ध केला आणि पॅरिसचे Prof. Louis Renon यांच्याशी पत्रव्यवहार करून Sanskrit English Dictionary on Historical Principles या प्रकल्पाची सुरुवात झाली. २५ वर्षपर्यंत संस्कृत १२०० ग्रंथामधून शब्द काढून त्यांच्या स्लिपा लिहून ८४ लाख स्लिपांचा संग्रह तयार झाला. त्यांचे अकारविल्हे वर्गीकरण करून मोठमोठ्या स्टील कपाटात कप्पे करून त्याचे एक महापत्रिकागार Scriptorium तयार केले.

डॉ. कत्रे निवृत्तिनंतर अमेरिकेत प्रथम व्हिजिटिंग प्राध्यापक व नंतर मुलीकडे स्थायिक झाले. नंतर त्यानी अष्टाध्यायीचे भाषांतर प्रसिद्ध केले. ते मद्रास युनिर्व्हसिटीमधून Maths Statistics घेऊन मास्टर्स पदव्युत्तर इंग्लंडला गेले. त्यावेळी त्याना त्याविषयात प्रवेश मिळाला नाही. तेव्हा तिथल्या भाषा शास्त्राच्या प्राध्यापकांनी तुम्हाला संस्कृत येते कां? विचारले. त्यावर त्यानी त्यांचा पाठशाळेत पाणिनीय व्याकरणाचा अभ्यास झाल्याचे सांगितले. तेंव्हा त्यांना त्या विषयांत पीएच.डी. साठी प्रवेश मिळाला. निवृत्तीपूर्वी त्यांनी Dictionary of Panini चे ३ खंड रचले. त्याच्या समर्पण पत्रिकेत खालील संस्कृत ओळ आहे

'शास्त्रीय पितरौवन्दे डोरोथी राल्फ टर्नरौ' ही ओळ कालिदासाच्या रघुवंशाच्या सुरुवातीच्या नमनाचा प्रतिध्वनी आहे. जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ।।

त्याची छाननी करून अकारादि क्रमाने डॉ. दांडेकरांच्या सुचनेवरून Encyclopaedic Dictionary of Sanskrit on Historical Principles यांचे महाखंड प्रसिद्ध होऊ लागले. धोरणाप्रमाणे त्रिपद-सामासिक शब्द घ्यायचे ठरले आणि दरवर्षी एक खंड असे गेल्या ४० वर्षात ३० हून अधिक खंड प्रसिद्ध झाले आहेत. पण अजून अप या उपसर्गाने सुरु होणारे शब्दच संपताहेत.

याचा वेग वाढवायचा तर संगणक शरणं गच्छामि हा मन्त्र म्हणावा लागेल. त्याशिवाय ६२ ज्ञानशाखातून शब्द घेतले असल्यामुळे संगणकाद्वारे छापील खंडातून निदान महत्त्वाच्या म्हणजे वैद्यक, शास्त्र, गणित, शिल्प, संगीत कला इ. विषयांचे लहान लहान कोश प्रसिद्ध करता येतील. योजकस्तव दुर्लभः।

**डॉ. प्रभाकर आपटे**

'श्रीरामचरितमानस' हा तुलसीदासांचा अद्‌भुत सिद्धमंत्रमय 'नाट्य महाकाव्य' या संज्ञेस पात्र ठरणारा ग्रंथ जगप्रसिद्ध आहे. पण याच ग्रंथाचे मराठीत चौपायी दोहा वृत्तातील रस-भाव-अर्थ राखून भाषांतर (समवृत्त समच्छंद) असे मराठी भाषिकांनाही फारसे माहीती नाही. या मराठी श्रीरामचरित-मानसाचे भाषांतर करणारे महाराष्ट्रीयन संत महात्मे प.पू. प्रज्ञानानंद सरस्वती दंडी स्वामी होत. या भाषांतरानंतर त्यांनी या ग्रंथावर सुमारे ७००० पानी टीका/भाष्य मराठी आणि हिंदीत लिहिलेले हिंदी - 'मानस गूढार्थ चंद्रिका' ७ खंड गीता प्रेस गोरखपूरने प्रसिद्ध केले आहेत. तर या स्वामींच्या शिष्यवर्गाने 'श्रीरामचरित मानस प्रेमी मंडळ' या रजि. ट्रस्ट द्वारे १७ खंडात ही मराठी टीका प्रसिद्ध केली आहे. या त्यांच्या अद्वितीय कार्याचा सन्मान म्हणून प्रसिद्ध साहित्यिक रा. चिं. ढेरे त्यांना 'महाराष्ट्राचे तुलसीदास' म्हणतात.

याच मराठी ग्रंथाधारे प्रज्ञानानंदांनी केलेले हे मानस-सरोवराचे रुपक आपण या लेखाद्वारे अभ्यासणार आहोत.

श्रीरामचरितमानस हे मानस-सरोवरापेक्षा श्रेष्ठ आहे कसे ते पहा. मानस-सरोवर (पूर्वी भारतात, सध्या दुर्दैवाने चीनच्या ताब्यात असलेले) गोड्या पाण्याचे जगातील सर्वात मोठे सरोवर आहे.

सीता व राम यांचे चरित्र जे शंकराच्या मनरुपी मानस सरोवरात अखंड विहरणारे आहे. हे त्यांनी स्वप्नदृष्टांताद्वारे तुलसीदासांना भाषाबद्ध करण्यास सांगितले तर तुलसीदासावतार प्रज्ञानानंद यांनी रामांच्या आज्ञेवरुन ते मराठी भाषाबद्ध केले. ते हे श्रीराम-चरित मानस (सरोवर).

'सुमति भूमि थळ हृदय अगाधू।
वेद पुराण उदधि घन साधू।।'' लेखक - संताचे हृदय ही या सरोवराची सखोल विस्तृत भूमि (Catchment Area) होय. वेद पुराण रुपी समुद्राचे जड खारे पाणी हे संतजन आपल्या तीव्र, तरल व सूक्ष्म बुद्धिने घनरुप करतात. तेच पुढे वर्षा-पर्जन्य बनून गोड होऊन पृथ्वीवर अवतरते ते या ग्रंथ रुपाने. मानस सरोवर दुरून पाहायलाही मनोहर आहे. त्याचे पाणी मधूर आहे. अर्थात ते श्रद्धापूर्वक 'तीर्थ' समजून प्राशन केले तर ते जीवाचे मंगलही करते. पण आजच्या वास्तव व विज्ञानवादी जगात ते तीर्थ व मंगलकारी वाटेलच असे नाही. पण हे रामचरित रामांच्या यातील सर्वच राजस सुकुमार रुपांनी, त्यांच्या नरनाट्य-लीलांनी, गुण स्वभाव शील व यश यामुळे मधुर, मनोहर व निश्चित कल्याण करणारे असचे आहे. जे रामभक्त आहेत त्यांचे तर हे 'जीवन'च आहे. संताच्या ऋतंभरा प्रज्ञेच्या स्पर्शाने श्रुती-स्मृतींप्रमाणेच हे ही अती पवित्र बनले आहे.

मानस-सरोवरास घाट नाहीत. पण या

रामचरित मानसास मात्र चार घाट आहेत. कैलासावर भगवान शंकर ही रामकथा पार्वतीस सांगत आहेत तो ज्ञान घाट आहे. प्रयागक्षेत्रीं याज्ञवल्क्य भरद्वाज मुनींना ही रामगाथा निरुपण करीत आहेत जो कर्म घाट. तर हिमालयाच्या नीलगिरी शिखरावर ही रामगाथा काकभुशुंडी मुनी गरुडास विशद करीत आहेत तो भक्ती घाट. अन् तुलसीदास व प्रज्ञानानंद 'स्वान्तःसुखाय' आणि 'स्वमन प्रबोधाय' ही रामकथा स्वतःच्या मनाला आत्मारामाच्या निर्गुण व सगुण साक्षात्कार करवीत निवेदन करीत आहेत तो दीन-घाट होय.

या प्रत्येक घाटाला सात-सोपान-पायऱ्या म्हणजे या ग्रंथातील सात कांडे होत. बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, लंकाकांड व उत्तरकांड या अनुक्रमे सात मोक्षपुऱ्या होत अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका व द्वारावती.

श्रीराम जे निगुर्ण निराकार परब्रह्म, ईश्वर वा अवतारी राजकुमार या विविध स्वरुपातील त्यांचे अगाध अपरिमित महत्त्व ही या सरोवराची खोली अगाधता आहे. राम-सीमा यांच्या नरलीलांमुळे हे पाणी अमृतासमान बनले आहे. यातील उपमादि सर्व साहित्यातील अलंकार ह्या यातील सुंदर लाटांचा विहार होय. चौपाया छंद, दोहा सोरठी ही वृत्ते म्हणजे या सरोवरातील कमलांचे ताटवेच आहेत. बालरामांचे रुप, गुणांची वर्णने ही पीत (पिवळी) कमळे, किशोर वा कुमार वसीन राम वर्णने विश्वामित्र यज्ञ-रक्षण करणारी वीर रसाची लाल कमळे, प्रथम सीता-रामांची दृष्टीभेट ते विवाहापर्यंत वर्णने ही गुलाबी, वनवासातील ऋषी-मुनींसमवेतची रामवर्णने श्वेत नीलकमले अशा प्रकारे अनेक रंग, सुगंधाने भरलेली ही कमळांचे ताटवे होत. काव्याचा अर्थ, भाव, भाषा हे त्या कमळाचे पराग, मकरंद व सुवास होत. या सरोवरातील हंस हे यातील ज्ञान, राजहंस हे यातील वेदांत वा अध्यात्म, अन् कलहंस (गाणारे हंस) ही यातील भक्ती होय. इतर अनेक जलचर, यावर विहरणारे पक्षी इ. म्हणजे यातील अर्थ-धर्म-काम-मोक्ष हे चार पुरुषार्थ, नवरस, लक्ष्यार्थ-गूढार्थ व साहित्यातील गुण प्रसाद-ओज-माधुर्य इ. आहे.

मानस सरोवराकाठी आम्रवन नाही. पण या रामचरित मानसा काठी सदैव संतसभारुपी आम्रवन नेहमी बहरलेले, मोहोरलेले व फळांनी एकाच वेळी लगडलेलेही असे असते. कारण श्रद्धेचा वसंत-ऋतू इथे बाराही महिने ठाण मांडून असतो. या आम्रवृक्षांना ज्या लतांनी आलिंगन दिले आहे त्या सर्व क्षमा-दयादि सद्गुणांच्या लता (वेली) होत. या आम्रवृक्षाचा मोहोर म्हणजे १० यम, १० नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहर, धारणा, ध्यान, समाधी व साधन चतुष्य विवेक, वैराग्य, शमदमादि साधन संपत्ती व मुमुक्षुता इ. आम्रफल म्हणजे ज्ञान असून त्यातील रस हा ज्ञानोत्तर भक्तीचा रस होय.

भक्त-भक्ती-भगवंत संबंधीची यातील

अनेक आख्यान-उपाख्याने म्हणजे या वृक्षावर सतत रुंजी घालणारे पक्षी शुक (शुक्राचार्य), कोकिळ (वाल्मीकी) इ. या आम्रवनाला सदैव सिंचन होते ते वाचकादिंच्या प्रेमाश्रू-भावाश्रूंनी. म्हणून जो आपल्या स्नेहजलाने हे वन सदैव हरे-भरे ठेवतो तो सु-मनाचा मानवाचा माळी होय. आणि या आम्रंवनाचा रखवालदार कोण आहे. तर जो रामकथा सादर सप्रेम गातो, विवरण करून सावधानपणे सांगतो, पठण-पारायण-मननादि करतो तो देवांपेखाही श्रेष्ठ असा या ग्रंथाचा अधिकारी होय. मग ती स्त्री असो वा पुरुष.

जे विषयी, कामलोलुप, दुष्ट असे कावळे बगळे या मान सरोवराजवळ जातात व कशाला, कारण तयांचे अंतर्मनातील दडलेले मृत्युभय व देहासक्तीदि मोह त्यांना तिथवर जाऊच देत नाहीत.

जे श्रद्धा व विश्वास यांचा वाटखर्च व शिदोरी अन् संत-सह प्रवाश्यांसह जातात त्यांना ही मानस-यात्रा अति दुर्गम असलेली सुगम होते. कारण या कलिकालातील कुसंगतीरुपी कुमार्गरुपी वाघ, सिंह, हत्ती, नाग-सापांसारखे अडथळे यांच्या आड येत नाहीत. की देहासक्ती गृहपरिवारासक्तीचे दुर्गम उंचच उंच पर्वत ही त्यांना अडवीत नाहीत. मोह, मान, मद रुपी घनघोर अरण्ये यांच्या रस्त्यात येतच नाहीत. अन् कुतर्कांच्या खोल व वेगवान नद्या ते सत्संगाच्या आधारे सहजी ओलांडून पार होतात.

'त्यजति न ते नर कधीं सरा या।<br>
ज्या सु-भाव रामाचे पायां।।<br>
ज्यां मनिं या सरिं बुडवूं अंगां।<br>
करो सुचित्रे तो सत्संगा।।

प्रत्यक्ष मानस सरोवराप्रत जाण्यासाठी पासपोर्ट, व्हिसा, मुख्यत्वे आर्थिक, शारीरिक व मानसिक बल हवे. पण या रामचरित मानस सरोवराप्रत जाण्यासाठी आर्थिक सबलता शारीरिक कष्ट इ. नकोतच. फक्त रामस्नेहाचा पासपोर्ट हवा. रामध्यान ध्यास इ. चा व्हीसा हवा. सीता-परम भक्ती, लक्ष्मण-वैराग्य, हनुमान-दास्य म्हणजे सेवाभाव (नवविधा भक्तींसह) अन् भरत वा बिभीषणासारखी शरण प्रपत्ती म्हणजे अहंकाररहित शरणागत भाव हवा. या सर्व साधन सामग्री निशी सज्ज होऊन जो या राम-चरित-मानस सरोवरा प्रत जातो. तो त्यात जस जसे अर्थ-भाव-रसात खोल खोल अवगाहन करत बुडतो तो तो जीव रामकृपेने सहजी तरतो, उद्धरतो.

**सौ. रेखा पटवर्धन**<br>
(प्रज्ञाशिष्या रामदासी)<br>
अक्षय रेस्टॉरंट समोर, वृंदावन हॉटेल मागे,<br>
मिरज - ४१६ ४१०<br>
दूरध्वनी : (०२३३) २२२१०८३<br>
भ्रमणध्वनी - ९४२३०३६११९

●●●

डॉ. वैशाली जयंत दाबके यांचा **'कौटिल्यीय अर्थशास्त्र (राजाचे शिक्षण)'** या लेखाचा पुढील भाग अपरिहार्य कारणामुळे या अंकात येऊ शकला नाही. त्याबद्दल क्षमस्व!

## अंतरात्म्याला भेटण्यासाठी करावी लागणारी 'अंतर्यात्रा' आणि त्यातील महत्त्वाचे टप्पे (मुक्काम)

प्र. सि. मराठे

सर्वांचे आदी जे ब्रह्मतत्त्व (परमात्मा) हे निर्गुण निराकार असल्यामुळे आपल्या पंचेन्द्रियांना ते अगोचर आहे. पण त्यानेच निर्माण केलेल्या विश्वात मात्र आपण त्याला या विश्वरुपात पाहू शकतो.

मी राजा रविवर्माला पाहिलेले नाही. पण तरीसुद्धा त्याने काढलेल्या सरस्वती लक्ष्मी आदी चित्रावरुन मी रविवर्माच्या त्या पैलूविषयी अनुभव घेऊ शकतो. त्याचप्रमाणे परमेश्वराने निर्माण केलेल्या प्रकृतीच्या निरनिराळ्या प्रक्रियांतील चमत्कार बघून आपण परमेश्वराच्या अकलनीय अशा बुद्धिमत्तेचा व अतुल्य सामर्थ्याचा अनुभव घेऊन त्याच्या विषयी मनात काहीतरी काल्पनिक रुप उभे करु शकतो. विषणुसहस्त्रनामात पहिल्याच क्रमांकावर 'विश्व' या नामाची योजना वेदव्यासांनी केली आहे. त्यानेच निर्माण केलेल्या सर्व भूतमात्रांत अनुभवास येणारे चैतन्य हे त्याचेच सर्व भूतांत सूक्ष्म अंशरुपात असणारे वास्तव्य दर्शविते. ब्रह्मतत्त्व हे त्यानेच निर्माण केलेल्या सर्व विश्वाला त्यांतील चराचरांना व्यापून असते असा वेदविद्येचा सिद्धांत आहे.

**विश्वरुपचि विष्णू हा विश्वा व्यापूनि राहिला।**

(सहस्त्रनामांचा अर्थ-विवरण करून सांगणाऱ्या मराठीत अनुष्टुपात बद्ध अशा विष्णुसहस्त्रनाम भावार्थाच्या पहिल्या श्लोकाचा पहिला चरण असा आहे.)

इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवाला परमेश्वराने भाव संवेदनशील आणि कल्पना करु शकणारे 'मन', पंचेन्द्रियांकडून मनाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचे विश्लेषण आणि स्वतंत्रपणे विचार करू शकणारी 'बुद्धी' व ते विचार व्यक्त करु शकणारी 'वाणी' या तीन विशेष गोष्टी प्रदान केल्या आहेत.

आपला देह हा सेंद्रिय (organic) पदार्थांनी बनला आहे. सेंद्रिय अन्नानेच या देहाचे घडण आणि वर्धन होत असते. म्हणून या देहाला 'अन्नमय कोश' अशी संज्ञा (वेद-विद्येत) आहे. या देहातील चैतन्य व त्याच्या अवयवांच्या क्रिया व प्रक्रिया चालविण्यासाठी लागणारी ऊर्जा, देण्यासाठी अंतरात्मा (जो स्वतः काहीच करीत नाही) 'प्राण' रुपात सर्व देहाला व्यापून असतो. हा मुख्य 'प्राण' देहातील पचन, विसर्जन, श्वसनादी क्रिया चालविण्यासाठी प्राण, अपान व्यान उदान आणि समान या पाच रुपात शरीरातील निरनिराळ्या ठिकाणी वसत असतो.

**अहं वैश्वनरो भूत्वा प्राणीना देहयाश्रितः।**
**प्राणापानसमायुक्तः पाचम्यन्नं चतुर्विधम् ।।१४।।**
**भ.गी.अ.१५**
**अहं आत्मा गुडाकेश सर्वभूताशयसितिः।।२०।।**
**भ.गी.अ.१०**

'मीच म्हणजेच अंतरात्मा वैश्वानर रुपात देहात बसून प्राणापानाच्या सहाय्याने

अन्न पचवतो' असा भगवद्गीतेतही उल्लेख आहे.

या पाचही प्राणांचा प्राणमय कोश हा अन्नमय कोशाला व्यापून असतो. माणसाला संवदेनशीलता व कल्पनाशक्ती देण्यासाठी 'अंतरात्मा' मनोमय कोश रुपात प्राणमय कोशाला पूर्णपणे व्यापून असतो. त्यापुढे माणसाला वैज्ञानिक दृष्टी व विचार करण्याची क्षमता देण्यासाठी अंतरात्मा (बुद्धिमय) प्रज्ञानमय कोश रुपात, मनामय कोशाला व्यापून स्थित असतो. आणि अखेरीस शुद्ध आनंद अनुभवण्याची क्षमता देण्यासाठी तोच अंतरात्मा आनंदमय कोश रुपात प्रज्ञानमय कोशाला व्यापून वसत असतो. आणि या आनंदमय कोशामध्ये एखाद्या गुहेत लपल्याप्रमाणे (निहित गुहायाम्) 'अंतरात्मा' गुप्त रुपात प्रतिष्ठित असतो.

थोडक्यात अन्नमय, प्राणमय, मनोमय, प्रज्ञानमय आणि आनंदमय अशा पाच कोशांनी अंतरात्मा वेढलेला असतो. तो स्वतः काहीच करीत नसला तरी वरील पाच (कोशांची) रुपे घेऊन त्यांच्याद्वारे देह, मन, बुद्धी आणि वाणी यांच्या क्रिया तो घडवीत असतो. व देहांतील अंतर्क्रियांवर माणसाचे नियंत्रण नसले तरी देहाच्या बाह्य क्रिया व मन-बुद्धींचे व्यापार याबाबतीत मात्र माणसाला पूर्ण स्वातंत्र्य असते. त्यात अंतरात्मा कोणताही भाग न घेता केवळ साक्षीरुपाने माणसाचे आचार आणि विचार पाहत असतो, व त्यांची नोंदही ठेवत असतो. आणि ही नोंद चित्रगुप्ताच्या 'मेन फ्रेम' वर आपोआप नोंद होण्याची व्यवस्थाही नेहमी कार्यरत असते.

या अनंत कोटी प्रकाशवर्षे आकाराच्या विश्वाला निर्माण करणारा परमात्मा आपल्यापासून किती दूर असेल याची कल्पना केलेलीच बरी! जेथे प्रकाशाला प्रकाशाच्या वेगाने (सेकंदाला १८६००० मैल) पोहोचावयास कोट्यांनी वर्षे लागतात तेथे १०० वर्षे आयुष्य असलेल्या मानवाची काय कथा! परंतु हाच परमात्मा सूक्ष्म रुपात आपल्या अंतरात आपल्या अगदी निकट असा उपलब्ध आहे. म्हणून त्याला मिळण्यासाठी 'अंतर्यात्रा' करण्याची गरज आहे. पण ती अंतर्यात्रा योगसाधनेनेच शक्य होते; आणि ती योगसाधना अत्यंत कठीण आहे. त्यामुळे तो आत्मा आपल्या अगदी निकट असून सुद्धा प्रत्यक्षात तो अत्यंत दूर असल्यासारखाच आहे.

**बहिरन्तश्च भूतानां अचरं चरमेव च।**
**सूक्ष्मत्वान् तद् अदिज्ञेयं दूरस्यं चान्तिके चतत्।।१५।। भ.गी.अ.१३**

मराठीत

**भूतांच्या आत बाहेर चर-स्थिर चि जे असे।**
**नेणवे सूक्ष्म म्हणूनी, जवळी पण दूर ते।।१५।।**

ते ब्रह्मतत्त्व (परमात्मा, परमेश्वर) जरी जवळ असले तरी ते अत्यंत सूक्ष्म रुपात स्थित असल्यामुळे पंचेन्द्रियांना ते अगोचर आहे. म्हणून त्याला ज्ञानचक्षूंनीच अनुभवावे लागते. आणि ते शक्य होण्यासाठी खडतर योगसाधनेची जरुर असते. आणि म्हणूनच ते (ब्रह्मतत्त्व) अगदी निकट असले तरी ते प्रत्यक्षात सामान्य माणसाला अतिदूर असल्यासारखेच आहे असे वरील श्लोकात सुचविले गेले आहे.

अशी साधना करण्याची इच्छाच हजारात एखाद्याला होते, आणि अशा लाखो साधकात एखाद्यालाच त्याच्या ज्ञानचक्षूंनी त्याचे दर्शन होऊन आत्मसाक्षात्कार होतो.

**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।**
**यततां अपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः।।३।। भ.गी.अ.३**

मराठीत -

**सहस्रांत कधी एक करी मोक्षार्थ साधना।**
**साधकांतही एखादा कोणी जाणे मला खरा ।।३।।**

परमात्मा अंशरुपाने सर्वांच्या अंतरात अदृश्य रुपात वसत असतो हे सत्य आहे. पण तो सामान्य माणसाच्या बाबतीत अगदी साक्षीरुपाने (वर सांगितल्याप्रमाणे) राहत असतो. त्याची भूमिका एखाद्या C. C. कॅमेराप्रमाणे असते. फरक एवढाच की C. C. कॅमेरा फक्त ध्वनि-चित्राचीच नोंद करतो. पण हा अंतरात्मा माणसाच्या मनांतील त्याच्या कृतीच्या मागील विचारांचीही नोंद करत असतो. कारण कोणत्याही कर्माची (बरी वाईट) प्रत ही त्या कृतीच्या मागे असलेल्या हेतूप्रमाणेच ठरत असते.

परंतु माणसाला अध्यात्माची जिज्ञासा निर्माण झाली. ईश्वर भेटीची तळमळ लागली व त्याची साधनेत उपासनेत प्रगती होऊ लागली की पंचकोशातील एक एक कोश भेटून त्याची देवाशी जसजशी जवळील वाढू लागते. त्याप्रमाणे हृदयस्थ आत्मा आपली केवळ बघ्याची (साक्षीरुपाची) भूमिका क्रमाक्रमाने कशी बदलत जातो. हे भ. गीतेच्या १३ व्या अध्यायातील बाविसाव्या श्लोकात गूढ पद्धतीने विशद केले आहे.

तो श्लोक असा -

**उपद्रष्टानुमन्ताच भर्ता भोक्ता महेश्वरः।**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः।।२२।।**

पहिली सामान्य स्थितीची पायरी.

**उपद्रष्टा**

उपद्रष्टा हा शब्द उप+दृश या धातूपासून बनला आहे. 'उप+पश्यति' या संस्कृत धातूच्या अर्थाच्या तीन छटा आहेत.

१) केवळ साक्षीभावाने पाहणे, २) देखरेख करणे (Supervision) आणि ३) स्वप्न पाहणे (भविष्याबद्दल आशा बाळगणे) जो मनुष्य नास्तिक आहे, किंवा अज्ञानामुळे ज्याला ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव नाही, अशा माणसाच्या बाबतीत परमेश्वर केवळ (१ल्या अर्थाच्या) उपद्रष्ट्याची भूमिका घेत असतो. म्हणजे अगदी अलिप्तपणे केवळ 'साक्षी'ची भूमिका घेवून, तो त्याच्या कर्माची केवळ नोंद ठेवत असतो.

परंतु जो मनुष्य अस्तिक असून ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव ठेवून वागतो व ईश्वराच्या उपासनेला लागलेला असतो, अशा माणसाच्या बाबतीत ईश्वर उपद्रष्ट्याचीच पण क्र.२ ची भूमिका घेतो, जसे एखादी दाई मुलावर नजर ठेवून पाहत असेल. मूल सामान्यपणे खेळत असते तेव्हा

दाई त्याच्याकडे केवळ साक्षीभावानेच पाहत असते, पण जर मूल नको ती वस्तू वा माती तोंडात घालू लागले किंवा ते पडावयास लागले तरच ती दाई धावत जाऊन त्या मुलाला तसे करण्यापासून परावृत्त करते. त्याचप्रमाणे या दुसऱ्या प्रकारात ईश्वर भक्ताकडे साक्षीभावाने पहात असताना, जर भक्ताच्या मनात काही वाईट विचार आला व तो दुष्कर्म करण्यास प्रवृत्त झाला. तर ईश्वर त्याच्या मनात सदसद्विवेक उपत्पन्न करून त्याला दुष्कर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. पुढे भक्ताच्या मनात भक्ती दृढ झाली, व त्याची साधनेत थोडीफार प्रगती झाली की मग अंतरात्मा (परमात्मा, ईश्वर) उपद्रष्ट्याचीच पण ३ऱ्या क्रमांकाची भूमिका घेतो व भक्ताच्या (भविष्यात) साधनेत आणखीन प्रगतिविषयी स्वप्न पाहू लागतो व परिणामी त्याच्या मनांत उपासनेवरची श्रद्धा दृढ करून साधनेविषयी गोडी निर्माण करतो.

साधना आणखी प्रगत झाली, नामात प्रेम उत्पन्न झाले व ते मुखातून निष्काम येऊ लागले की त्या भक्ताचे अगदी प्राथमिक स्वरुपाचे का होईना ईश्वराशी अनुसंधान साधू लागते, व त्यामुळे ईश्वर, उपद्रष्ट्याच्या पुढील म्हणजे अनुमन्त्याची भूमिका घेऊ लागतो. भक्ताचा साधनेविषयी किंवा प्रापंचिक व्यवहाराविषयी काही चांगला निर्णय होऊ घातला असेल तर ईश्वर आतल्या आवाजाच्या माध्यमातून त्या निर्णयाला अनुमोदन देतो, व भक्ताचा आत्मविश्वास व उत्साह वाढवितो. बरेच वेळा भक्ताला 'हे करू की ते करू' दोन पर्यायांतील कोणता पर्याय निवडू असा संभ्रम पडतो. अशावेळी हा आतला आवाज भक्ताला अंतिम निर्णय घेण्यास मदत करतो. अनेक मोह-प्रसंगी हा 'अनुमन्ता' भक्ताला मोहापासून आवरुन त्याला सन्मार्मावर आणून ठेवतो. हा अनुमन्ता भक्ताला स्वसुखापेक्षा दुसऱ्याच्या सुखात आनंद मनावयास शिकवतो. थोडक्यात साधना-सिद्धीसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या 'निर्वैर शुद्धमन व सदाचार' या दोन गोष्टी भक्ताच्या मनात बिंबवण्यासाठी ईश्वर अनुमन्त्याच्या भूमिकेत प्रयत्नशील राहतो.

याप्रमाणे भक्ताचे मन शुद्ध होऊन सदाचार अंगी बाणला, की भक्ताची साधना पुढील प्रगत स्तरावर उडी घेते. साधनेच्या या मुक्कामावर भक्त पोहोचला की भक्ताची देहबुद्धी कमी कमी होत जाऊन देवबुद्धी वाढू लागते, व मग ईश्वर अशा भक्ताच्या बाबतीत अनुमन्त्याची भूमिका सोडून त्याच्यापुढील भर्त्याची भूमिका घेतो. साधनेत मग्न असताना देहाचे विस्मरण झाल्यामुळे भक्ताकडून एखादे वेळी प्रपंचातील कर्तव्याकडे दुर्लक्ष होण्याचा प्रमाद घडू शकतो, अशा वेळी हा भर्ता झालेला ईश्वर, कार्यरत होतो, व ती उणीव भरुन काढतो. गोरोबा कुंभार आपल्या पेशाप्रमाणे माती तुडवण्याचे काम करीत असताना हरीनामात इतका तल्लीन झाला, की त्याचे मूलच मातीत तुडवले गेल्याचे त्यास कळले नाही. केवढा मोठा प्रमाद त्याच्याकडून घडला होता! पण तो प्रमाद नामात तल्लीन झाल्यामुळे अनवधानाने घडला होता. म्हणून

ईश्वर भर्त्याच्या रुपात धावून आला व त्याचे मूल त्याने त्याला सुखरुप परत मिळवून दिले.

तुकारामबुवांचे वडिलोपार्जित घर होते. पण त्यांचे कुटुंब मोठे व ते प्रपंचासाठी काहीच कमावत नव्हते. त्यामुळे घरात त्यांच्या पत्नीला मुलांना खाऊ घालण्यास काय अडचणी आल्या असतील याची कल्पना केलेलीच बरी! त्यावेळी पांडुरंग भर्त्याच्या भूमिकेत त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह चालवत असे. पण तोही अशा रीतीने की कोठेही रेचचेल न दिसता, तुकारामबुवांच्या तो नजरेत येणार नाही असा! कारण तुकारामबुवांनी, शिवाजी महाराजांनी पाठविलेले जडजवाहिर, 'हे पाप माझ्या घरात नको' असे म्हणून सादर परत पाठविले होते.

दामाजीपंतांनी दुष्काळग्रस्त लोकांना वाटलेल्या सरकारी धान्याची किंमत याच भर्त्याने, महाराच्या (झाला महार पंढरीनाथ) रुपात येऊन मोहरांचा ढीग पाडून बादशहाला फेडली होती. भगवंताने गीतेत नवव्या अध्यायातही असेच म्हटले आहे.

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्**
**॥२२॥**

मराठीत समश्लोकी -

**अनन्यभावें भक्तीने मला भक्त उपासती।**
**जे नित्ययोगि त्यांचामी योगक्षेमचि चालवी**
**॥२२॥**

उपासनेच्या वर सांगितलेल्या उच्च अवस्थेला पोचलेल्या, परमेश्वराशी नित्य अनुसंधान साधलेल्या भक्ताच्या बाबतीतच आपले कर्तव्य कर्म करीत असताना देहबुद्धी हरपल्यामुळे झालेल्या उणीवा हा भर्ता भरुन काढतो, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. 'असेल हरि तर देईल खाटेवरी' अशा वृत्तीने केवळ आळसापोटी कोणी प्रपंचातील कर्तव्ये पार न पाडता, जपमाळ घेऊन स्वस्थ बसेल, तर त्याच्या कुटुंबाचा निर्वाह परमेश्वर चालवील असे मात्र कोणी समजू नये.

आता यापुढे भक्ताची उपासना (साधना) उपरिनिर्दिष्ट अवस्थेच्याही पलीकडे प्रगत झाली की हृदयस्थ परमेश्वर (म्हणजेच आत्मा) त्या भक्ताचा सहभोक्ताच होतो. महणजे भर्त्याची भूमिका सोडून तो आता भक्ताचा सहभोक्ताच होतो. या अवस्थेत जिवा-शिवाचे नाते आणखीनच घनिष्ट होते, आणि भक्ताला द्वैताकडून अद्वैताकडे पोहोचण्याच्या आधीची मधली स्थितीच जणू प्राप्त होते. अशा पायरीवर भक्त जेवून समाधान पावला की त्याच्याशी जोडलेला परमेश्वरही समाधान पावतो व भक्ताला वैश्वानराला तोषविल्याचा दिव्य आनंद (परमानंद) प्राप्त होतो. भक्ताला जर काही खुपले, इजा झाली तर तेही कृष्णसखाच झेलतो. संतसखूला सासूने काठीने मारल्याचे वळ कृष्णसखाच झेलत असे. तापलेल्या कालथ्याने तिच्या अंगावर दिलेले डाग कृष्णाच्या अंगावर उठत असत, व कृष्णस्मरणात देहबुद्धीच हरपलेल्या सखूला मात्र भाजल्याचे काहीच दुःख जाणवत नसे. या अवस्थेत भक्त जे बरे-वाईट भोगतो

त्याचा भोग परमेश्वरच घेऊ लागतो. या अवस्थेत भक्त जरी द्वैतात असला तरी जिवा-शिवाचे जवळ जवळ मीलनच झालेले असते, व त्यामुळे (शिव) परमात्मा जीवाची (भक्ताची) पाठ अजिबात सोडत नाही. नामदेवांनी (त्यांच्या घरात घरकाम करणाऱ्या) जनीच्या बाबतींत, अभंगात असेच म्हटले आहे.

**'जनी जाय पाणीयायी, उभा मागे हृषिकेशी'**

संत नामदेवांना आत्मानुभव आलेला असल्यामुळे, जनी काम करत असताना तिच्या मागे मागे रहाणारा श्रीकृष्ण रुपातला परमात्मा त्यांना ज्ञानचक्षूंनी दिसला होता म्हणून त्यांनी असा अभंग रचला.

संतसखू जनाबाई यांच्यासारख्या गावंढळ गृहिणींनी केवळ अनन्यभक्तियुक्त, संपूर्ण समर्पण भावनेने प्राप्त केलेली तुरीया अवस्था एवढी, भव्य-दिव्य होती की नामदेवांसारख्या पूर्ण भक्तियोग्यालाही सामान्य जनांना अनन्यभक्तीचे महत्व पटवून देण्यासाठी कृष्ण-जनाबाईच्या अद्वैताचे वर्णन एवढ्या आदराने करावेसे वाटले.

(प्रस्तुत लेखकाच्या भगवद्गीतार्थ या पुस्तकातील परिशिष्ट ३ मध्ये हे आले आहे.)

गीताज्ञान-नवनीताचे ११७ व ११८ क्रमांकाचे श्लोक असे आहेत.

**संतसखू जनाबाई दळता कांडताच त्या।**
**अनन्यभक्तिभावेंचि गेल्या ब्रह्मपदास त्या ।।११७।।**

**कर्मकाण्डी फळाशी जे वेदवेदीहि लोक ते।**
**नच मुक्ती मिळे त्यांना विनाभक्ती अश्रद्ध जे ।।११८।।**

कितीही ज्ञानी पंडित असला, कर्मकाण्डी असला, तरी अनन्यभक्तीशिवाय त्याला मुक्ती मिळत नाही, उलट संतसखू जनाबाईंसारख्या वेदविद्येचा गंधही नसलेल्या सामान्य गृहिणींना अनन्य भावभक्तीच्या प्रभावाने मुक्ती मिळाली. हेच गीताज्ञान-नवनीतात अखेरीस सांगितले आहे.

वर वर्णन केलेली संतसखू जनाबाई यांच्या भक्तीची अवस्था (पायरी) ही अद्वैतात शिरण्यापूर्वीची शेवटची अवस्था (पायरी) होय. तिला तुरीया (चवथी) भक्ती म्हणतात. आणि त्या अवस्थेत ईश्वर भक्ताचा सहभोक्ता असतो. या भक्तीच्या तुरीया अवस्थेत 'साधक' ईश्वरीय अनुसंधानाच्या अल्पशा उत्तेजनानेही अद्वैतावस्थेला समाधीस्थ होऊ शकतो.

(टीप : ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे अर्जुनही गीता-कथन प्रसंगी या तुरीया अवस्थेस पोचला होता. त्यामुळे कृष्ण वचनामृत ऐकता ऐकता तो (बरेच वेळा) अद्वैतावस्थेत जाऊन त्याची समाधीच लागत असे. तेव्हा कृष्ण त्याला जागे करून पुन्हा द्वैतावस्थेस आणत असे. कारण कृष्णाला अर्जुनाकडूनच दृष्ट कौरवादिकांना शासन करवावयाचे होते. )

पातञ्जल योगाच्या मार्गानेही शेवटच्या आठव्या पायरीवर योगी याच अवस्थेस

पोहोचतो तिलाही 'समाधी' अशीच संज्ञा आहे.

भक्तिमार्गाच्या या अंतिम प्रगत अवस्थेस भक्त पोहोचला की अंतस्थ ईश्वर, भोक्त्याची भूमिकाही सोडून त्या भक्ताला आपल्यात सामावून घेणारा 'महेश्वर' होतो.

उपसंहार - याप्रमाणे भक्ताच्या भक्तीच्या पायरीप्रमाणे किंवा साधकाच्या उपासनेच्या पायरीप्रमाणे केवळ उपद्रष्ट्यापासून थेट महेश्वरापर्यंत निरनिराळी रुपे घेणारा जो अंतस्थ ईश्वर त्यालाच परमात्मा किंवा ब्रह्म-तत्त्व म्हणतात, व त्या परमात्म्याशी अद्वैत साधण्याच्या सिद्धीलाच मुक्ती किंवा मोक्ष अशी संज्ञा आहे, असेच भगवान या श्लोकाद्वारे सांगत आहेत. मोक्ष या अंतिम स्थानकाकडे (Terminus) नेणाऱ्या मार्गावरील निरनिराळे टप्पे किंवा मुक्काम (Stations) साधकाला भक्तिसाधनेच्या पायऱ्यांनी कसे गाठावयाचे असतात, व या प्रत्येक मुक्कामी परमेश्वराशी भक्ताची जवळीक कशी कशी क्रमाक्रमाने दृढ होत जाते याचा आलेखच या श्लोकात गूढ रित्या दाखवला आहे असे या श्लोकाचे महत्त्व आहे.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

•••

(पृष्ठ क्र.१२ वरून...**मनुष्य स्वभाव, वागणूक, आणि रोजचे जीवन, संघर्ष)**

निर्माण झालेली लहान मुले व तरूणांत वाढीला लागलेली मला सर्व मिळालेच पाहिजे व मिळेल तरच मी काही करेन हा वाढत चाललेला हट्टीपाणा दिसून येतो. पालकही आम्हाला कांही कारणाने जे मिळू साकले नाही, ते माझ्या पाल्यास मी देणे हे महत्वाचे आहे अशी मनाची समजूत काढत असतो. पण याचे तोटे कोणते या कडे काणा डोळा करत असतो. याचा दूरगामी परिणाम म्हणजे बालपणा पासूनच आजी, आजोबा - भाऊ, बहीण - इतर नातेवाईक व शेजारी पाजारी याच्या सहवासात राहिल्याने त्याचे सल्ला व विचार यातून वाढणारा इतरास समजून घेणे व वेळ प्रसंगी तडजोड करण्याचा स्वभाव वाढीस लागण्यास मुकत असतो. पालक वा आई वडील दोघांनाही आजच्या जीवनातील धावपळीत ही सर्व भूमिकां निभावण्यास वेळ मिळताच नाही.

याच्या बरोबरीने तंत्रज्ञान क्रांतीने जग जवळ आहे आहे. त्याचा परिणाम म्हणजे आजचा बाकाक अधिक वेगाने बहुश्रुत, चौकस व प्रश्न विचारणारा झाला आहे. त्याच्या या या उत्सुकतेचे समाधान करणे व त्या बरोबर वरील संस्कृत सुभाषितातील मातीतार्थ त्याच्या पर्यंत पोचविण्याचे प्रयत्न झालेच पाहिजेत. तरच भविष्यात काही मोठे बदल दिसतील व कपाळाला हात लावण्यासही वेळ येणार नाही.

**श्री. प्रकाश दीक्षित**
भ्रमणध्वनी :९८१९६९३१९

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

श्रेष्ठ दान नाही. शिळ्या अन्नापेक्षा ताज्या शिजवलेल्या अन्न पदार्थांना आपण जास्त महत्व देतो.

आपले वैद्यकशास्त्र म्हणजे आयुर्वेदामध्ये आहाराला सर्वात जास्त महत्त्व आहे. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात 'भोजनकुतुहल' हा ग्रंथ रघुनाथ या पंडिताने लिहिला. असे शेकडो पाकशास्त्रावरील संस्कृत आणि प्राकृत ग्रंथ ग्रंथालयात संशोधनाच्या प्रतिक्षेत पडून आहेत. २००१ मध्ये ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने Dietetics in Ancient Indian ही आंतरराष्ट्रीय परिषद भरविली होती. बऱ्याच संशोधकांनी आपले शोधनिबंध त्यामध्ये वाचले. Bibliography of Dietetics in Ancient and Medieval India ही या विषयावरील महत्त्वपूर्ण सूची डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी संपादित करून संस्थेने प्रकाशित केली. अभ्यासूंनी ती अवश्य वाचावी.

काळ बदलला, जीवनशैली बदलली आणि अन्नप्राशनाला फक्त ''उदरभरण'' एवढीच किंमत राहिली.

निसर्गचक्रातील असंतुलनामुळे कधीकधी या देशामधे दुष्काळ पडल्याची उदाहरणे असली, तरी सर्वसाधारणपणे पोट भरेल एवढे अन्न लोकांना मिळत होते. इंग्रजांच्या वसाहतवादाच्या काळामधे सरकारी धोरणांमुळे शेतीवर परिणाम होऊन दुष्काळ पडल्याची उदाहरणे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळामधे, जगाप्रमाणेच भारतातील शेती-उत्पादनात मोठी क्रांती झाली. दळणवळणांमधील सुधारणांमुळे देशाच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकापर्यंत विनासायास अन्न पोहचू लागले. उद्योगधंद्यातील प्रगतीमुळेही मोठ्या प्रमाणावरती शहरे आणि त्यामधला मध्यमवर्ग निर्माण झाला. ही सगळी जमेची बाजू असली, तरी जीवनशैलीमध्ये जे बदल होत होते, ते मात्र नक्कीच 'शरीर' आणि 'मन' यामधील संतुलन बिघवडणारे ठरु लागले. दळणवळणामधील क्रांतीमुळे शारीरिक 'कष्ट' किंवा 'श्रम' जवळजवळ नाहीसे झाले. जीवनशैलीतला सर्वात मोठा बदल हा त्याच्या 'कार्य'शैलीमधे झाला. व्यापक स्वरुपात आपण ज्याला 'नोकरी' म्हणतो, हाच प्रत्येकाचा व्यवसाय झाला.

याचा सर्वात मोठा परिणाम त्याच्या खाद्यसंस्कृतीवर झाला. सीमित उपलब्धतेने म्हणा, किंवा जेवणाखाण्यामधील वेळेसंबंधी असलेली सांस्कृतिक शिस्त म्हणा, सकाळच्या न्याहारीपासून रात्रीच्या जेवणापर्यंत काय खायचे आणि किती खायचे यामधे काहीतरी सुसंगती होती. विशेष किंवा गोडधोड खाणे हे सण, किंवा समारंभापुरतेच मर्यादित होते. ताज्या शिजवलेल्या अन्नाला जास्त किंमत होती.

सुबत्ता आणि जीवनशैलीमधील बदलामुळे बाजारातील तयार अन्नाची बाजारपेठ प्रचंड प्रमाणात वाढू लागली. कुटुंबाचे एकत्र जेवण हेही यामुळे दुर्मिळ झाले. बाजारांमधे निर्माण होणारे अन्न हे त्याच्या पोषणमूल्यापेक्षा, साठवण आणि विक्री मूल्याशी निगडीत झाले. यात आणखीन भर पडली ती जीवनशैली प्रमाणेच, खाद्यशैलीतही पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण झाले याची.

प्रचंड प्रमाणातील औद्योगिकीकरण

आणि आर्थिक सुबत्ता यामुळे पाश्चिमात्य देशांमधे, खाद्यसंस्कृतीतील हे बदल विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच सुरु झाले होते. शारीरिक कष्ट जवळजवळ नाहीत, खाण्यातील अनियमितता आणि सुटसुटीतपणाच्या नावाखाली असंतुलित पिष्टमय पदार्थांचे अतिसेवन याचा व्हायचा तोच परिणाम, त्यांच्या शरीर प्रकृतीवर दिसू लागला.

साखर, जास्त पिष्टमयता, मिठाळ आणि शिळे पण गरम केलेल्या अन्नाचे, 'जंक फुड' (Junk Food) असे नामकरण झाले. १९७२ साली Michael F. Jacobson या समाजविज्ञान संस्थेत काम करणाऱ्या एका कार्यकर्त्यांने हा शब्द प्रथम अशा अन्नाला वापरला. अशा अन्नामुळे आणि कमी झालेल्या व्यायामामुळे अमेरिकन नागरिकांचा स्थूलपणा तर वाढू लागलाच, पण हृदयरोगापासून कर्करोगापर्यंतच्या सगळ्या रोगांचे प्रमाण बेसुमार वाढत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. शेतीमाल आणि खाद्यपदार्थांचे बाजारीकरण हा औद्यागिकीकरणाचाच पुढचा टप्पा होता. घरी ताजे अन्न शिजवून खाण्यापेक्षा उपहारगृहामधे खाण्याला जास्त प्रतिष्ठा मिळू लागली. चटपट, झटपट अन्ने मिळण्याचे, मॅकडौनल्ड आणि बर्गर संस्कृतीची उपहारगृहे यामधूनच निर्माण झाली. जंकफूडच्या ह्या अनिर्बंध सेवनामुळे अमेरिकेतील मुलांमधे येणारा स्थूलपणा आणि त्यामुळे येणाऱ्या अनेक व्याधी, यांचे प्रमाण आजही बेसुमार वाढतच आहे.

अमेरिकेतील सरकार, आणि तेथील समाजस्वास्थ्याशी निगडीत असलेल्या संस्थांनी यावर प्रचंड संशोधन चालू केले. निष्कर्ष त्यांच्या डोळ्यासमोरच होते, फक्त गरज होती ती आकडेशास्त्रावर आधारित वैज्ञानिक पुराव्यांची. सगळ्याच बाबतीत सांस्कृतिक साम्य असल्यामुळे युरोपमधील देशांमधेही या 'जंक'फुडचा मोठा प्रादुर्भाव होता.

सुदैवाने आणि अनुभवातून धडे घ्यायच्या वृत्तीमुळे अमेरिकेमध्ये आणि युरोपमध्येही आज या जंकफुडवरती बरेच निर्बंध आले आहेत. शाळेमधून आणि शाळेच्या जवळपास जंकफुड विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. साखर, मीठ, पिष्टमयपदार्थ, शर्करायुक्त, सोडायुक्त थंडपेय या सगळ्या वस्तूंच्या विक्रीवर यातील घटकांचे प्रमाण लिहिण्याचे बंधन घालण्यात आले. अशा पदार्थाच्या अन्न सेवनामुळे शरीरावर विपरीत परिणाम होतो याचे शिक्षण शाळा–महाविद्यालयांतून मिळू लागले. या पदार्थांच्या जाहिरातबाजींवरही नियंत्रणे घालण्यात आली. थोडक्यात, मनुष्य जे अनुभवातून शिकतो त्याची प्रत्यक्षात कुठेतरी अंमलबजावणी करण्याचा हा प्रयत्न होता. आज अमेरिकन जनता आपल्या या जीवनशैलीची फार मोठी किंमत मोजत असली तरी त्यांचा बदलण्याचाही मोठा प्रयत्न चालू आहे. आपल्याकडे बदल तर सोडाच पण आपला ओढा 'जंक फूड' खाण्याकडे अधिकाधिक झुकत आहे. न्याहरीतील शिरा, गाकर किंवा पानगी हे पदार्थ केव्हाच इतिहास जमा झाले आहेत. जेवणातील चौरस आहाराची जागा आता 'बर्गर' आणि 'पिझ्झा' या जंकफूडने घेतली आहे.

हा प्रश्न फक्त शेती उत्पादन किंवा शाकाहारा पुरताच मर्यादित नाही. अमेरिका किंवा युरोपमधील देशांमध्ये मोठ्या प्रमाणवर मांसाहारही केला जातो. मटण, कोंबडीचे मांस किंवा मासे हे मांसाहारी खाण्याचे प्रमुख घटक आहेत. शेतीप्रमाणेच या सगळ्या घटकांच्या उत्पादनाच्या वाढीवरही भर देण्यात आला. विज्ञानातल्या अनेक क्लृप्त्या याकरता वापरल्या गेल्या. याच्याही बाजारपेठा किंवा व्यापार चालू झाला. व्यापार आला की अर्थकारण आले, अर्थकारण आले की स्पर्धा आली. अमेरिकेतील व्यापार आणि वैज्ञानिकांनी कोंबडीचे मांस पावाच्या तुकड्याइतके स्वस्त करण्याचा विडा उचलला आणि त्यात ते यशस्वीही झाले. अर्थातच याची फार मोठी किंमत अमेरिकाच नाही तर सगळ्या मानव जातीला आज द्यावी लागत आहे.

यातूनच, कोबड्यांची पैदास वाढवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. माणसांप्रमाणे कोंबड्यांमध्येही रोग असतात. हे रोगही विषाणुंमुळेच होतात. आपल्या रोगांवरती प्रतिजैविके (antibiotics) वापरुन अशा रोगांवर बऱ्याच मोठ्याप्रमाणावर विजय मिळवण्यात आला. साहजिकच अशा प्रतिजैविकांचा बेसुमार आणि अनिर्बंध वापर चालु झाला. कोंबड्यामधेही त्यांना रोग होऊ नये म्हणून कमी मात्रेने ही प्रतिजैविके देण्यात येऊ लागली. याचा व्हायचा तोच विपरीत परिणाम दिसायला लागला.

या प्रतिजैविकांना हळुहळु या जीवाणूंनी प्रतिसाद देणे कमी होऊ लागले. प्रतिजैविकांची मात्रा वाढू लागली, तशी जीवाणुची प्रतिकारशक्ती तर वाढलीच, पण त्यांच्यामध्ये उत्परिवर्तन (Mutation) होऊन त्यांच्या नवीन जाती निर्माण व्हायला लागल्या. या नवीन जिवाणूंच्या जातींचे वैशिष्ट्ये असे की, ते प्रतिजैविकांशी झगडण्याची प्रतिकारशक्ती घेऊनच जन्माला येतात. अर्थात अशा जिवाणुंवर पारंपारिक प्रतिजैविकांचा वापर निरुपयोगी असतो. साहजिकच नवीन प्रतिजैविकांचा शोध घेण्यात येतो. जीवाणु प्रतिकारशक्ती घेऊन पुन्हा जन्माला येतात. आज या लढाईमधे जीवाणु यशस्वी झाले असून, आपली नवीन प्रतिजैविके काढण्याची ताकद क्षीण होऊ लागली आहे. महत् प्रयत्नांनी अशी काही प्रतिजैविके जरी काढण्यात आली तरी ती भयानक महागडी आणि सीमित काळापुरतीच उपयुक्त ठरणारी असतात.

शेतीमध्ये वापरण्यात येणारी खते आणि किटकनाशकांचा वापरही बेसुमार वाढला आहे. आज आपली सगळी शेती हीच 'संकरीत' आहे. त्याच्या पिष्टमयतेत वाढ झाली असली तरी त्याचे खाद्यमूल्य आणि गोडी दोन्ही आज आपण हरवले आहे. नाविन्य, प्रगती आणि हव्यासामुळे, परंपरागत शेती आणि विविधतेने नटलेली खाद्यसंस्कृती आज आपण जवळजवळ नष्ट केली आहे. समाजात वाढत जाणारा लठ्ठपणा आणि मधुमेहाचे वाढते प्रमाण ही त्याचीच लक्षणे आहेत.

संसर्गजन्य रोगांवरती आपण विजय मिळवला असे आपल्याला वाटत होते. आज आपण ती लढाई हरायला सुरुवात झाली आहे. संसर्गजन्य, आणि मटण किंवा कोंबडीचे मांस

सेवन केल्यामुळे होणाऱ्या विषबाधेवर आज प्रतिजैविके निष्प्रभ ठरतांना दिसत आहेत.

केवळ हव्यास, अविवेकी आणि नितीशून्य व्यापाराच्या प्रभावामुळे संपूर्ण मानवजातीपुढे आज एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.

कुठल्याही युद्धापेक्षा याचा धोका मानवजातीला अधिक असल्याचा वैज्ञानिकांचा कयास आहे. याची दखल नुकतीच संयुक्त राष्ट्रसभेनेच नाही, तर जागतिक आरोग्य परिषद (WHO), G.8., G20 ई. राष्ट्रसमुहांनीही याची गंभीर दखल घेतली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे सचिव Ban-ki-Moon यांच्याच शब्दात सांगायचे तर,

"Antimicrobial resistance poses a fundamental, long-term threat to human health, sustainable food production and development. It is a very present reality - in all part of the world, in developing and developed countries, in rural and urban areas in hospitals on farms and in communities. We are losing our ability to protect both people and animals from life-threatening infections.:

अनुभवातून आपण खरेच शहाणे होतो का?

''पुढच्यास ठेच मागचा शहाणा'' अस आपण नेहमीच म्हणत असलो तरी आपल्याला 'शहाणपणा' सुचतोय अशी आजची आपली परिस्थिती बघून नक्कीच वाटत नाही. जंकफूड, खत, किटकनाशक किंवा प्रतिजैवकांचा अती वापर असो किंवा सामाजिक क्षेत्रातील आपली जाणीवशून्य बेजबाबदार वागणूक असो, ज्या पाश्चात्त्य संस्कृतीचे आपण अंधानुकरण करतो, त्यांच्याकडून आपण फार काही शिकायला तयार नाही. पेहरावापासून, भाषेपर्यंत या परिस्थितीत फारसा फरक नाही. धर्म नेतृत्वापासून, राजकारणापर्यंत सर्वचजण लोकानुनय करण्यात मग्न आहेत. 'प्रबोधन' किंवा वेळप्रसंगी वाईटपणा घेण्याची कोणाचीच तयारी नाही. अशावेळी आठवण होते ती समर्थ रामदास स्वामींची दासबोधामध्ये दिलेल्या शंभरहून अधिक मूर्खांच्या लक्षणांची. रामदास स्वामी म्हणतात.

''अक्षरे गाळून वाची। का ते घाली पदरिची।
निगा न करी पुस्तकांची। तो येक मूर्ख।
आपण वाचिना कधीं। कोणास वाचावया नेदी।
बांधोन ठेवी बंदी। तो येक मूर्ख।।''

पुढच्याच समासामधें रामदासस्वामी उत्तम लक्षणांचीही यादी देतात. त्यातले एक महत्वाचे लक्षण

''वाट पुसिल्याविण जाऊं नये। फळ वोळखिल्याविण खाऊं नये। पडिली वस्तु घेऊ नये। येकायेकी।।''

संतांची शिकवणही आज आपण विसरू लागलो आहोत हेच खरे!!

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१